www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १२ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार १५ मे २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## संयमाची कसोटी... तळपते ऊन, कोंदट वातावरणात
# एनडीआरएफच्या जवानांची अविरत सेवा

● मुंबई, यश सावंत :

घाटकोपर येथील छेडा नगरमधील पोलीस वसाहतीनजीकच्या पेट्रोल पंपावर सोमवारी सायंकाळी ४.१५ च्या सुमारास कोसळलेल्या महाकाय होर्डिंगमुळे संपूर्ण मुंबई हादरली. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथकातील (एनडीआरएफ) जवान आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी बचावकार्य हाती घेत जीवाची बाजी लावत ८९ जणांना बाहेर काढले. पेट्रोल पंपावर दुर्घटना घडल्यामुळे आगीच्या ठिणग्या उडण्याची शक्यता असलेल्या कुठल्याही यंत्राचा वापर न करता केवळ मनुष्यबळ आणि क्रेनच्या साहाय्याने बचावकार्य हाती घेण्यात आले. तळपते ऊन, घामाच्या धारा, कोंदट वातावरणात मंगळवारी जवानांच्या संयमाची कसोटी लागली. जाहिरात फलकाच्या



लोखंडाच्या सांगाड्याखाली प्रवेश करत एनडीआरएफच्या जवानांनी अनेकांचे प्राण वाचविले.

दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान, संबंधित पालिका विभाग कार्यालयातील कर्मचारी, रुग्णवाहिका, पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. मात्र, दुर्घटनेची तीव्रता लक्षात घेऊन एनडीआरएफच्या पथकाला पाचारण करण्यात आले. घटनेची तीव्रता लक्षात घेऊन तात्काळ एनडीआरएफचे दुसऱ्या पथकालाही बचावकार्यासाठी बोलाविण्यात आले. लोखंडी सांगाड्याखाली दबल्या गेलेल्या काही गाड्यांमधून पेट्रोल, डिझेलची गळती झाली होती. त्यामुळे आगीच्या ठिणग्या उडणाऱ्या कुठल्याही यंत्राचा वापर केल्यास जीवावर बेतण्याची शक्यता होती. मुंबई महानगरपालिकेच्या अभियंत्यांच्या सल्ल्याने क्रेन मागविण्यात आल्या. घटनास्थळी २५० आणि ५०० मेट्रिक टन क्षमतेच्या क्रेन तैनात करण्यात आल्या. क्रेनच्या साहाय्याने मंगळवारी रात्री दोन्ही बाजूने जवळपास ४ फुटापर्यंत लोखंडी सांगाडा उचलण्यात आला. जीव मुठीत घेऊन जवळपास १०० मीटर आत जाऊन एनडीआरएफच्या जवानांनी अडकलेल्या जखमींना बाहेर काढले. रात्रभर काळोखात अवितरतपणे बचावकार्य सुरू होते. केवळ क्रेन आणि मनुष्यबळाने हे बचावकार्य करण्यात आले. लोखंडी सांगाड्याची दुसरी बाजू उचलण्यासाठी मंगळवारी सकाळी क्रेन दुसऱ्या बाजूला नेण्यात आल्या. मात्र, पुरेशा जागेअभावी एकाच क्रेनचा वापर करण्यात आला. पान २ वर

## ठाणे शहरात ८८ वृक्ष उन्मळून पडली, वृक्ष प्राधिकरण विभागाला आली उशिराने जाग



● ठाणे, रोहित जैसवाल :

ठाण्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या अवघ्या काही मिनिटांच्या पावसाने शहरातील विविध भागात तब्बल ८८ वृक्ष उन्मळून पडल्याची घटना घडली आहे. सुदैवाने यात जिवीतहानी झाली नसली तरी मात्र वाहनांचे आणि घरांच्या पत्र्यांचे नुकसान झाले आहे.

परंतु एवढ्याशा पावसाने वृक्ष पडल्याने महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यातही धोकादायक स्थितीत शहरात किती वृक्ष आहेत, याची माहिती वृक्ष प्राधिकरण विभागाकडे नाही. सोमवारी झालेल्या दुर्घटनेनंतर आता या विभागाकडून धोकादायक वृक्षांचा सर्व्हे हाती घेण्यात आला आहे. पान २ वर

## थोडक्यात



### नाशिकमध्ये पावसाने ५१३ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

● पुणे, सचिन कदम

नाशिक, सचिन कदम : जिल्ह्यात आठ ते ११ मे या कालावधीत वादळी वाऱ्यासह झालेल्या वळिवाच्या पावसाचा ४१ गावांतील ५१३ हेक्टरवरील पिके आणि फळबागांना फटका बसला. यात सर्वाधिक ४७५ हेक्टरवरील आंब्याचे नुकसान झाले आहे. नैसर्गिक संकटात १३३८ शेतकरी बाधित झाले. अनेक तालुक्यात घरांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली. या नुकसानीचे पंचनाम्याचे आदेश प्रशासनाने दिले असले तरी बहुतांश कर्मचारी निवडणूक कामात असल्याने हे काम संथपणे पुढे सरकत आहे. पान २ वर

### कोल्हापुरात संभाजी महाराज जयंती सोहळ्यात १२ तास लाठीकाठीचा उपक्रम



● कोल्हापूर, विशाल पाटील :

येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त मंगळवारी सायंकाळी भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्याच्या निनादात निघालेल्या या मिरवणुकीत छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील विविध घटनांचे सादरीकरण करण्यात आले होते. यामध्ये लक्षवेधी ठरले ते सलग १२ तास लाठीकाठी फिरवण्याचा उपक्रम. पान २ वर

## आधी कर्तव्य मतदानाचे... गर्भवती महिलेचे रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी मतदान

● पुणे, अभिजित येरल्लू :

प्रसुतीसाठी चाकण येथील माहेरी गेलेल्या गर्भवती महिलेने रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी मतदान केले. जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी या महिलेसाठी विशेष रुग्णवाहिकेची व्यवस्था केल्याने या महिलेला शिवाजीनगर मतदारसंघातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. पुणे, मावळ आणि शिरूर लोकसभा मतदारसंघांमध्ये सोमवारी मतदान झाले. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी निवडणूक प्रशासनाने मतदारांसाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला, गर्भवती महिलांना



सुलभरित्या मतदानाचा हक्क बजावता आला. शालू राठोड ही महिला प्रसुतीसाठी चाकण येथे माहेली गेली होती. त्यांचे नाव शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीत होते. प्रसुतीची तारीख १४ मे असल्याने त्यांना रुग्णालयात दाखल व्हायचे होते. पान २ वर

## उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक संजय पाटील अटकेत; दोन दिवसांची पोलीस कोठडी

● चंद्रपूर, नितीन देवळेकर :

गेल्या सात दिवसांपासून फरार असलेले उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक संजय पाटील यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने पाचगणी येथून ताब्यात घेतले. त्यांना चंद्रपुरात आणल्यानंतर सोमवारी रात्री उशिरा अटक करण्यात आली. मंगळवारी सायंकाळी पाटील यांना जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले असता १६ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

'बियर शॉपी'च्या परवान्यासाठी एक लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी पाटील यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. याप्रकरणातील इतर आरोपी दुय्यम निरीक्षक चेतन खारोडे व कार्यालय अधीक्षक अभय खताळ यांना सोमवारी जामीन देण्यात



आला, मात्र पाटील यांचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला होता. यानंतर 'एसीबी'ने तपासाला गती दिली. सुरुवातीला कोल्हापुरातील एक अज्ञातस्थळी लपून बसलेल्या पाटील यांनी तीन-चार दिवसांपूर्वीच सातारा जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण असलेल्या पाचगणी येथे मुक्काम हलवला होता. याची माहिती मिळताच 'एसीबी' पथकाने पाटील यांना पाचगणी येथून ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना चंद्रपुरात आणण्यात आले व येथेच त्यांना अटक करण्यात आली. पान २ वर

## दिल्लीतील शाळा, विमानतळ आणि रुग्णालयानंतर आता तिहार तुरुंगात बॉम्ब हल्ल्याची धमकी, तपास सुरू

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

दिल्लीतील शाळा, विमानतळ आणि रुग्णालयानंतर आता तिहार तुरुंगात बॉम्बस्फोट करण्याची धमकी देण्यात आली आहे. मंगळवारी ईमेलद्वारे तुरुंग प्रशानाला ही धमकी प्राप्त झाली. याप्रकरणी दिल्ली पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. तसेच ईमेल पाठवणाऱ्याचा शोध घेतला जात आहे. याबरोबरच याठिकाणी बॉम्ब स्कॉडदेखील तैनात करण्यात आल्याची माहिती आहे. वृत्तवाहिनीच्या वृत्तानुसार, बॉम्बस्फोट




करण्याची धमकी देणारा एक ईमेल आज तिहार तुरुंग प्रशासनाला प्राप्त झाला होता. त्यानंतर तिहार तुरुंग प्रशासनाने याची माहिती दिल्ली पोलिसांना दिली. दिल्ली पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होत घटनेचा तपास सुरू केला. तिहार तुरुंगात सध्या हाय प्रोफाईल प्रकरणातील आरोपींना ठेवण्यात आलं आहे. यामध्ये काही राजकीय नेत्यांचादेखील समावेश आहे.

विशेष म्हणजे अशाच प्रकारच्या धमकीचा ईमेल सोमवारी दिल्लीतील काही रुग्णालयांना प्राप्त झाला होता. यामध्ये जीटीबी रुग्णालय, दादा देव रुग्णालय, हेडगेवार रुग्णालय आणि दीप चंद्र बंधू रुग्णालय या महत्त्वाच्या रुग्णालयांचा समावेश आहे. दरम्यान, काल धमकी ईमेल मिळताच दिल्ली पोलिसांनी या रुग्णालयात दाखल होत तपास केला. मात्र, त्यांना संशयास्पद अशी कोणतीही वस्तू आठळून आली नाही.

अशाच प्रकारची धमकी काही दिवसांपूर्वी दिल्लीतील १०० पेक्षा जास्त शाळांना मिळाली होती. यामध्ये मयूर विहार येथील मदर मेरी स्कूल, द्वारका येथील दिल्ली पब्लिक स्कूल, चाणक्यपुरी येथील संस्कृती स्कूल, वसंत कुंज येथील दिल्ली पब्लिक स्कूल आणि साकेतमधील एमिटी स्कूल यांचा समावेश होता. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी शाळांची झडती घेतली. मात्र, या ठिकाणी कोणीही बॉम्बसदृष्य वस्तू आढळून आली नव्हती.

## माथेरानमध्ये गारांचा पाऊस; पर्यटक सुखावले

● नवी मुंबई, भावना जैन :

सध्या अनेक पर्यटक माथेरानमध्ये उन्हाळी सुट्टीचा आनंद लुटत आहे. माथेरामध्ये गारांचा पाऊस पडला आहे. या पावासामुळे माथेरानमध्ये आलेले पर्यटक सुखावले आहेत. मात्र, या अवकाळी पावसामुळे येथील नागरिकांची मोठी तारांबाळ उडाली. सोमवारी बदलापूरमध्ये देखील गारांचा पाऊस पडला होता.

राज्यभरात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. अशातच आता रायगड जिल्ह्यातील माथेरानमध्ये देखील अवकाळी पाऊस पडला आहे. माथेरान परिसरात अवकाळी पावसाचे धुमशान घातले आहे. जवळपास तासाभर जोरदार पाऊस कोसळला. पावसाबरोबर गाराही बरसल्या आहेत. माथेरान मध्ये सलग तिसऱ्या



दिवशी अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. हवामान विभागाने दिलाय रायगड जिल्ह्यात अवकाळी पावसाचा इशारा दिला होता. माथेरान हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ आणि थंड हवेचे ठिकाण आहे. हजारो पर्यटक माथेरानला फिरण्यासाठी येतात. धुक्यात हरवलेले हिरवेगार डोंगर पर्यटकांना आकर्षित करतात. पावासामुळे माथेरानमध्ये फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांचा आनंद द्विगुणीत झाला आहे. पान २ वर

## वडाळा पार्किंग टॉवर दुर्घटना : झोपु प्राधिकरणाकडून
# विकासकाला कारणे दाखवा नोटीस



● मुंबई, दिगंबर जाधव :

मुंबईत सोमवारी दुपारी वादळी वाऱ्यामुळे वडाळा येथील वाहनतळासाठी उभारण्यात आलेला लोखंडी सांगाडा कोसळला. या प्रकरणाची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने गंभीर दखल घेतली असून झोपु प्राधिकरणाने मंगळवारी विकासकावर 'कारणे दाखवा' नोटीस बजावली.

वडाळ्यातील बरकत अली नगर येथील गणेश सेवा झोपु प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पातील पुनर्वसन इमारतींचे काम पूर्ण झाले होते. तर वाहनतळ उभारण्याचे काम सुरू होते. यासाठी लोखंडी सांगाडा उभारण्यात आला होता. त्यावर कॉंक्रिटीकरण करण्यात येणार होते. मुंबईत सोमवार दुपारी वादळी वारा वाहू लागला आणि दुपारी ४.१५ च्या सुमारास हा सांगाडा कोसळला. या दुर्घटनेत तीन जण जखमी झाले. या घटनेनंतर मुंबई महानगर पालिकेसह झोपु प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर लोखंडी सांगाड्याचे अवशेष हटविण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली. हे काम रात्रभर सुरू होते. सकाळी १० च्या सुमारास सांगाड्याचे अवशेष हटविण्याचे काम पूर्ण झाल्याची माहिती झोपुतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. अवशेष हटविल्यानंतर बरकत अली नगर येथील वाहतूक सुरळीत झाल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. पान २ वर

## शिपाई, फेरीवाला हटाव पथकात काम करणाऱ्या सफाई कामगारांना घनकचरा विभागात हजर राहण्याचे उपायुक्तांचे आदेश

● कल्याण, विशाल कारंडे :

कल्याण डोंबिवली पालिकेच्या घनकचरा विभागातील अनेक सफाई कामगार प्रभागांमध्ये फेरीवाला हटाव पथक, अधिकाऱ्यांचे शिपाई, टपाल वाहक म्हणून काम करतात. रस्त्यावर झाडू मारण्यापेक्षा कार्यालयात ऐषआरामात काम करण्यास मिळत असल्याने हे कामगार वर्षानुवर्ष लोकप्रतिनिधींच्या आशीर्वादाने प्रभाग कार्यालये, पालिका मुख्यालयांमध्ये कार्यरत आहेत. अशा सर्व सफाई कामगारांनी तातडीने आपल्या मूळ नियुक्तीच्या घनकचरा विभागात हजर व्हावे, असे आदेश घनकचरा विभागाचे




उपायुक्त अतुल पाटील यांनी सोमवारी दिले.

कल्याण डोंबिवली शहरे कचरा मुक्त करण्याचे अभियान यशस्वी होत आहे. या कामासाठी घनकचरा विभागाला सफाई कामगारांची नितांत आवश्यकता आहे. आता कार्यरत असलेले बहुतांशी सफाई कामगार हे ५० वयाच्या पुढील आहेत. त्यांची क्रयशक्ती कमी झाली आहे. पान २ वर

> “ घनकचरा विभागातील सफाई कामगारांनी प्रभागात विनामंजुरी इतर विभागात सहाय्यक आयुक्तांच्या आदेशाने पदस्थापना घेतल्या असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित साहाय्यक आयुक्तांवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित केली जाईल. सफाई कामगारांनी आपल्या मूळ घनकचरा आस्थापनेत तातडीने हजर व्हावे.
>
> - अतुल पाटील, उपायुक्त, घनकचरा विभाग

## संपादकीय

# पाणीप्रश्नातही चिनी आव्हान

पाण्याच्या साठ्यांवर पडणारा ताण वाढत असून, भूजलपातळीच्या बाबतीत आपण जबाबदारीने वागलो नाही, तर २५ वर्षांत जगाच्या काही भागांत प्यायलाही पाणी नाही, अशी स्थिती ओढवू शकते. 'वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट'च्या अहवालातील आकडेवारी या गंभीर वास्तवाकडे लक्ष वेधणारी आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील जलव्यवस्थापनाचा आढावा आणि चीनने उभे केलेले आव्हान यांची चर्चा.

आगामी काळात दर चार व्यक्तींमागे तीन जणांना पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावणार आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यावरून संघर्ष अटळ आहे. ५१ देशांत अतिभीषण ते भीषण स्वरूपाची पाणीटंचाई जाणवेल, असे संयुक्त राष्ट्रांतर्गत कार्यरत संस्थांच्या काही अहवालांत नमूद करण्यात आले आहे. यात दक्षिण आशियातीलही काही देश असतील.

वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट'च्या (डब्लूआरआय) अहवालातही भूजलपातळीबाबत जबाबदारीने वागण्याची सूचना करण्यात आली आहे. तसे न केल्यास जगाच्या काही भागात प्यायलाही पाणी नाही, अशी स्थिती उद्भवेल,असा इशारा देण्यात आला आहे.

पिण्याचे पाणी जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर प्रत्येक व्यक्तीला पोहोचवायचे असेल तर त्यासाठी शास्त्रशुद्ध नियोजन व दीर्घकालीन योजना आखण्याची गरज आहे. दुसरीकडे ज्या पद्धतीने चीनसारखे देश पिण्याच्या पाण्याबाबत हुकूमशाही करत आहेत, इतर राष्ट्रांचा विचार न करता धरणे बांधत आहेत, त्यामुळे भारतासह अनेक दक्षिण आशियाची देशांच्या समस्या वाढल्या आहेत आणि यावर सामूहिक उपाययोजना होणे गरजेचे आहे.

आपल्याकडे भूगर्भातील पाणीसाठ्याचे प्रमाण अत्यल्प आहे. पृथ्वीवर ७१ टक्के भाग जलयुक्त आहे. त्यातील ९७ टक्के पाणी हे खारे म्हणजे समुद्रात आहे. दोन टक्के पाणी हिमनगांमध्ये आहे आणि उर्वरित केवळ एक टक्का पाणी पिण्यायोग्य आहे. चीनच्या तुलनेत भारतात अत्यंत कमी प्रमाणात भूजल साठवले जाते. दुसरीकडे, भारतात असणारी धरणांची संख्याही इतर देशांच्या तुलनेत खूप कमी आहे. त्यामुळे भारतात पिण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण होणार आहे. आतापासूनच विचार करून कृतिकार्यक्रम हाती घेणे आवश्यक बनले आहे.

एकविसावे शतक हे आशिया खंडाचे असेल असे म्हटले जाते. आशिया खंडातील अर्थव्यवस्था झपाट्याने प्रगतिपथावर जात आहेत. पण आशिया खंडात इतर खंडांच्या तुलनेत दरडोई पिण्याच्या पाण्याची उपलब्धता खूप कमी आहे. आशिया खंडात प्रतिव्यक्ती सर्वांत कमी म्हणजे ३.९२० क्युबिक मीटर इतके पाणी आहे.त्यामुळे आशिया खंडालाच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सतावणार आहे. रशियातील बाल्कन सरोवर हे जगातील सर्वाधिक स्वच्छ पाणीसाठा असणारे सरोवर. अमेरिकेपेक्षाही या सरोवरामध्ये पाणीसाठा जास्त असतो. पण आशिया खंडात अशा प्रकारच्या साठ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे या प्रश्नाची व्यापकता व दाहकता वाढत जाईल.

सर्वाधिक देशांबरोबर चीनचे वाद सुरू आहेत. त्याचप्रमाणे जगामधील सर्वाधिक धरणे चीनमध्ये आहेत. ही संख्या आहे ८६ हजार. अमेरिकेतील धरणांची संख्या ५५०० आहे. भारतात त्याहीपेक्षा कमी धरणे आहेत. चीनकडची ३० हजार धरणे पंधरा मीटर उंचीची आहेत. त्यांना सर्वांत मोठी धरणे म्हटले जाते. या धरणांच्या माध्यमातून चीनने त्यांच्या देशात वाहणाऱ्या नद्यांवर नियंत्रण प्रस्थापित केले आहे. आशिया खंडामध्ये जमीनीवरील पाण्याची साठवणूकक्षमताही चीनकडे सर्वाधिक आहे आणि त्याचा वापर चीन करतच आहे. चीन इतक्या अवाढव्य प्रमाणावर पाणी का साठवत आहे? यामागे चीनची लोकसंख्या आणि भौगोलिक रचना कारणीभूत आहे. चीनमध्ये सर्वाधिक नद्या दक्षिण भागात आहेत तर तेथील बहुतांश लोकसंख्या उत्तर आणि पूर्व भागात एकवटली आहे. त्यामुळे उत्तर आणि पूर्व भागात पाण्याचे प्रमाण तुलनेने कमी आहे.




## आजची चित्रोळी

राजा सारखा बैसलाहेस काय
घरटं विणायला मदत कर !
पंखात अडकवून काड्या आण
बांधून होईल तरच लौकर !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### नाशिकमध्ये पावसाने ५१३...

चार ते पाच दिवसांपासून अनेक भागात वादळी वारा, विजांच्या कडकडाटासह पाऊस कोसळत आहे. जिल्ह्यातील अनेक भागात घरांची पडझड झाली. वीज पडून चांदवड तालुक्यात एका महिलेचा मृत्यू झाला तर सिन्नरमध्ये घराची भिंत पडून महिला जखमी झाली. वीज पडून पशुधनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वादळी पावसाने हातातोंडाशी आलेला आंब्याचा घास हिरावला गेला. नुकसानीच्या प्राथमिक अहवालानुसार ४१ गावातील १३३८ शेतकरी बाधित झाले. या गावातील एकूण ५१३ हेक्टरवरील पिके आणि फळपिकांचे नुकसान झाले. डाळिंबाचे (साडेचार हेक्टर), द्राक्ष (१.२१ हेक्टर) यासह काही ठिकाणी मका व कांद्याचे नुकसान झाले. २४ हेक्टरवरील इतर पिकांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. नैसर्गिक संकटाची सर्वाधिक झळ येवला तालुक्यास बसली. या तालुक्यातील २९ गावांतील १२७० शेतकऱ्यांचे नुकसान झाले. या एकाच तालुक्यात ४६९ हेक्टरवरील आंबा आणि २४ हेक्टरवरील अन्य पिके असे ४९३ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. सुरगाणा आणि नाशिक तालुक्यात प्रत्येकी चार गावांना पावसाचा फटका बसला. नाशिकमध्ये (साडेसात हेक्टर), सुरगाणा (३.५१ हेक्टर), दिंडोरी (चार), सटाणा (३.८०) आणि निफाड (१.२१ हेक्टर) पिकांचे नुकसान झाले.

### कोल्हापुरात संभाजी महाराज जयंती...

पापाची तिकटी परिसरातील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज समितीच्या वतीने आज जयंती कार्यक्रम आयोजित केला होता. त्यामध्ये पहाटेपासून लाठीकाठी उपक्रमाचे आयोजन केले होते.

सैनिकाचे गाव गिरगाव येथील भैरवनाथ तालमीचे मल्ल संपत दत्तात्रय पाटील यांनी ८ वर्षांचा मुलगा दक्ष त्याच्यासोबत सलग १२ तास लाठीकाठी फिरवत मर्दानी खेळाचे चित्तथरारक प्रात्यक्षिक दाखवले. त्यास नागरिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

### संयमाची कसोटी तळपते ऊन, कोंदट...

मुंबई महानगरपालिकेचे कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान आणि पोलीस घटनास्थळी अविरतपणे बचावकार्यात सहभागी झाले होते. क्रेन स्थापित करण्यासाठी सुमारे अडीच ते तीन तास लागत असल्यामुळेही बचावकार्यात विलंब झाला. दरम्यान, मनुष्यबळाच्या साहाय्याने सांगाड्याच्या बाहेरील परिसरात जवानांनी बचावकार्य सुरू ठेवले. मात्र, होर्डिंगच्या लोखंडी सांगाड्याचे वजन क्रेनच्या क्षमतेपेक्षा अधिक होते. पाऊस पडून गेल्यामुळे होर्डिंगच्या खालील भागात पाणी साचले होते. बचावकार्यादरम्यान अनेक जवानांना किरकोळ दुखापत झाली. मात्र, बचावकार्य सुरूच होते.

एनडीआरएफच्या प्रशिक्षणात शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या कणखर बनविले जाते. त्यामुळे अशा आव्हानात्मक परिस्थितीतही बचावकार्य करताना ताण आला नाही. लोखंडी सांगाडा कोणत्याही क्षण कोसळण्याची शक्यता होती. त्यामुळे सावधगिरी बाळगूनच त्याखाली जात होतो. सांगाड्याखाली पुरेशा प्रमाणात प्राणवायू नव्हता. दुर्गंधीमुळे जीव नकोसे झाले होते. यामुळे बचावकार्यात अडथळे निर्माण झाले, अशी माहिती एनडीआरएफचे मुख्य हवालदार विजय पाटील यांनी दिली.

हायड्रोलिक क्रेनच्या साहाय्याने सोमवारी रात्रीपर्यंत होर्डिंगचे ३ गर्डर उचलण्यात आले. त्यांनतर, एनडीआरएफच्या जवानांनी होर्डिंगच्या लोखंडी सांगाड्याच्या आत शिरून बचावकार्य केले. पेट्रोल पंप असल्यामुळे पुरेशा यंत्रांचा वापर करता आला नाही. त्यामुळे बचावकार्य अधिक आव्हानात्मक ठरले, असे एनडीआरएफचे असिस्टंट कमांडर निखिल मुधोलकर यांनी सांगितले.

फलक हटवण्यासाठी आणखी दोन दिवस लागणार

एनडीआरएफ जवान, अग्निशमन दल आणि काही तज्ज्ञांनी सल्लामसलतीअंती हा फलक उचल्याण्याचा प्रयत्न केला. यासाठी मोठ्या क्रेन मागवण्यात आल्या होत्या. गॅस कटरच्या साह्याने हा फलक तोडण्याचा विचार होता. मात्र पेट्रोल पंपावरील पेट्रोल, डिझेलचा साठा लक्षात घेता गॅस कटरचा वापर धोकादायक ठरण्याची शक्यता होती. तूर्तास हा फलक तोडण्यात येत आहे. त्यामुळे संपूर्ण फलक हटवण्यासाठी दोन दिवस लागतील, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

### आधी कर्तव्य मतदानाचेगर्भवती महिलेचे...

मात्र रुग्णालयात जाण्यापूर्वी त्यांनी मतदान करण्याची इच्छा प्रशासनाकडे व्यक्त केली. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांच्या सुचनेनुसार उपजिल्हाधिकारी अर्चना तांबे यांनी राठोड यांच्यासाठी चाकण ते शिवाजीनगर या प्रवासासाठी विशेष रुग्णवाहिकेची व्यवस्था केली. त्यामुळे राठोड यांनी दुपारी मतदान केंद्रावर येऊन मतदानाचा हक्क बजावल्यानंतर त्या येरवडा येथील राजीव गांधी रुग्णालयात त्या प्रसूतीसाठी दाखल झाल्या.

शिरुर विधानसभा मतदारसंघात पिंपळे जगताप केंद्रावर १०६ वर्षांच्या रखमाबाई शेळके, १०५ वर्षांच्या अनुसया सोंडेकर यांनी मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले. शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात ९८ वर्षाच्या विमला शिंगणे, पिंपरी विधानसभा मतदारसंघातील ९८ वर्षाच्या लक्ष्मीबाई गराडे, ९० वर्षाच्या कलावती कांबळे यांनीही मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावला.

### उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक...

अधीक्षक पाटील यांच्या संपर्कात असलेल्या चंद्रपुरातील उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी, कुटुंबीय व इतरांवर तसेच त्यांच्या भ्रमणध्वनीवर 'एसीबी'चे विशेष लक्ष होते. त्याच माध्यमातून पाटील यांचा सुगावा लागला. मंगळवारी सायंकाळी पाटील यांना जिल्हा न्यायाधीश एक तथा अति. सत्र न्यायाधीश प्रशांत काळे यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी सरकारी वकील व पाटील यांच्या वकिलांनी युक्तीवाद केला. न्यायाधीश काळे यांनी दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून पाटील यांची १६ मेपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली. आता पाटील यांच्या संपूर्ण संपत्तीची चौकशी होणार असल्याची माहिती आहे.

उत्पादन शुल्क विभाग, चंद्रपूरचे दुय्यम निरीक्षक खारोडे व कार्यालय अधीक्षक खताळ यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे, तर उत्पादन शुल्क अधीक्षक संजय पाटील यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. दोन्ही अधिकारी ४८ तासांपेक्षा अधीक काळ पोलीस कोठडीत होते. यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. पाटील यांना अटक झाल्याने त्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या प्रकरणाची 'एसआयटी' चौकशी करावी, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे, तर आमदार सुधाकर अडबाले यांनीही तिन्ही अधिकाऱ्यांच्या संपत्तीची चौकशी करावी, अशी मागणी गृहमंत्र्यांकडे केली आहे.

### माथेरानमध्ये गारांचा पाऊस...

रायगडच्या उत्तर भागात संध्याकाळी अवकाळी पावसानं जोरदार हजेरी लावली. कर्जत, खालापूर, पेण अलिबाग तालुक्यांमध्ये जोरदार वा-यासह मुसळधार पाऊस बरसला. वा-याबरोबर धुळीचे लोट वाहून जात होते. दोन दिवसांपासून जिल्ह्यात आकाश ढगाळलेलं होतं. सोमवारी संध्याकाळी आलेल्या पावसाने नागरिकांची तारांबळ उडाल्याचं पाहायला मिळालं. तर काही ठिकाणी पावसासह गाराही पडल्या. पावसामुळे अनेक भागांत वीज पुरवठा खंडित झाला. रायगड जिल्ह्यात हवामान खात्याने 15 मे पर्यंत पावसाचा यलो अलर्ट दिला आहे.

सोमवारी नवी मुंबईतही जोरदार वा-यासह मुसळधार पाऊस बरसला. नवी मुंबई, पनवेल, उरणमध्ये जोरदार वा-यासह पाऊस पडला. नवी मुंबई शहराला अवकाळी पावसानं झोडपलं. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची एकच तारांबळ उडाली. तर ऐरोलीतल्या सेक्टर 5 मध्ये जोरदार वा-यामुळे रस्त्यावर झाड कोसळलं.

### वडाळा पार्किंग टॉवर दुर्घटना...

वडाळा दुर्घटनेनंतर झोपु योजनेतील कामाच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित झाला आहे. झोपु प्राधिकरणाने या दुर्घटनेची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे. तसेच विकासक न्यूमेक कंपनीवर मंगळवारी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याचेही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. आठ दिवसात विकासकाने यावर उत्तर देणे अपेक्षित आहे. आठ दिवसात यावर काय उत्तर येते यावर पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

### शिपाई, फेरीवाला हटाव पथकात काम...

सफाई कामगार म्हणून कार्यरत असलेले ३५ ते ५० वयोगटातील अनेक सफाई कामगार वर्षानुवर्ष नगरसेवक, आमदार, राजकीय नेते यांच्या आशीर्वादाने कल्याण डोंबिवली पालिकेच्या मुख्यालयात अधिकाऱ्यांचे दालन, यापूर्वी महापौर, सभापती यांच्या दालनात शिपाई, प्रभागात फेरीवाला हटाव पथकात वर्णी लावून घेण्यात यशस्वी झाले आहेत.

रस्त्यावर काम करण्यासाठी घनकचरा विभागाला सफाई कामगारांची आवश्यकता असताना, ६० हून अधिक सफाई कामगार प्रभागांमध्ये फेरीवाला हटाव पथक, साहाय्यक आयुक्तांचा शिपाई, टपाली, आवक जावक लिपिक म्हणून काम करत आहेत. सफाईचे मूळ काम सोडून त्यांना प्रशासकीय कामात सहभागी होण्याची मुभा दिली कोणी, असे प्रश्न करत काही माजी नगरसेवक, काही जागृत नागरिकांनी यासंदर्भात पालिका आयुक्त, घनकचरा विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत.

या तक्रारींची गंभीर दखल घेऊन उपायुक्त अतुल पाटील यांनी पालिकेच्या दहा प्रभागांमध्ये जे सफाई कामगार अन्य कामे करत आहेत. त्यांनी तातडीने आपल्या मूळ नियुक्तीच्या घनकचरा विभागात हजर होण्याचे आदेश दिले आहेत. सफाई कामगारांची बदली अन्य कोणत्याही विभागात करू नये, असे आयुक्तांचे स्पष्ट आदेश आहेत. सफाई कामगारांचे नियंत्रक म्हणून उपायुक्त घनकचरा हे नियंत्रक अधिकारी आहेत. असे असताना प्रभागातील साहाय्यक आयुक्त घनकचरा विभागाची परवानगी न घेता सफाई कामगारांना आपल्या अधिकारात अन्य विभागात बदली करत आहेत, असे उपायुक्त पाटील यांच्या निदर्शनास आले आहे. अशा नियमबाह्य नियुक्त सफाई कामगारांनी तातडीने सफाई कामगार म्हणून घनकचरा विभागात तातडीने हजर व्हावे, असे आदेश उपायुक्त पाटील यांनी दिले आहेत.

काही दिवसापूर्वी ह प्रभागातील फेरीवाला हटाव पथकातील सफाई कामगार दिलीप उर्फ बुवा भंडारी यांनी ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजय कुमावत यांच्या बरोबर रेल्वे स्थानक भागात मंडप टाकण्यावरून हुज्जत घातल्याने अंगचोर सफाई कामगारांचे प्रकरण उघडकीला आले आहे.

# निवडणूक आयोगाकडून तंत्रज्ञानस्नेही कारभाराला प्राधान्य; मतदारांच्या हाती अत्याधुनिक ॲप्स

मुंबई - निवडणूक आयोग तंत्रस्नेही उपाययोजना राबवत आहे. यानुसार आचारसंहितेचे उल्लंघन होत असेल, तर मतदारांना त्याची तक्रार नोंदवता यावी आणि उमेदवारांनाही प्रक्रियेतील सर्व सोपस्कार पार पाडता यावेत, म्हणून आयोगाने मतदार आणि उमेदवारांच्या हाती अत्याधुनिक सहा ॲप दिले आहेत.

सी-व्हिजिलचे अस्त्र

निवडणूक जिंकण्यासाठी अनेकदा उमेदवार गैरमार्गाचा वापर करतात किंवा आचारसंहितेचे उल्लंघन करतात. त्यावर वॉच ठेवता यावा, सहजपणे तक्रार नोंदवता यावी म्हणून सी व्हिजिल मोबाईल ॲप उपलब्ध करून दिले आहे. त्याआधारे नागरिकांना सहजपणे एखाद्या घटनेचे चित्रीकरण, छायाचित्र काढून निवडणूक आयोगाकडे तक्रार नोंदवता येते.

1) याप्रकरणी सी व्हिजिल ॲपवर आलेली तक्रार अवघ्या १०० मिनिटात नोंदवून घेत त्याची माहिती तक्रारदाराला दिली जाते.

2) तक्रारदाराचे नाव गुप्त ठेवले जाते.

3) आचारसंहिता उल्लंघनाचे ठिकाण शोधण्यासाठी जीपीएस प्रणालीचा वापर करून तातडीने कारवाई केली जाते.

वोटर टर्नआऊट

मतदान सुरू असताना किती टक्के मतदान झाले याची प्रत्येक दोन तासाची आकडेवारी वोटर टर्नआऊट ॲपच्या माध्यमातून मिळत आहे. राज्य, जिल्हा आणि मतदारसंघाची माहिती मिळत असल्याने त्याचे विश्लेषण करणे सोपे जाते. तसेच हवी असलेली आकडेवारी या ॲपच्या माध्यमातून फिल्टर करता येत.

वोटर हेल्पलाईन ॲप

वोटर हेल्पलाईन ॲपच्या माध्यमातून देशातील मतदारांना सेवा आणि माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे हे या ॲपचे उद्दिष्ट आहे. तसेच नागरिक या ॲपच्या माध्यमातून निवडणूक आयोगाशी कनेक्ट राहू शकतात.

मतदार यादीत नाव शोधणे

नवीन नोंदणीसाठी अर्ज करणे

मतदार यादीतील नाव हटवणे, त्यामध्ये दुरुस्ती करणे

मतदान, ईव्हीएम, निकालाबाबत असलेल्या शंका विचारणे

उमेदवाराचे शिक्षण, पात्रता, मालमत्ता, गुन्हेगारी प्रकरणे आदी माहिती मिळवता येते

निवडणूक अधिकारी- कर्मचाऱ्यांशी संपर्क साधता येतो.

केवायसी ॲप

मतदारांना केवायसी ईसीआय ॲप म्हणजे नो युवर कॅण्डीडेट.




यामध्ये आपल्या मतदारसंघात निवडणुकीसाठी उभा असलेला उमेदवार कोण आहे, त्याचे नाव, गाव, मालमत्ता, गुन्हेगारी प्रकरणे, शिक्षण आदी सर्व प्रकारची माहिती उपलब्ध होतो. त्याचबरोबर निवडणूक आयोगाने मतदारांच्या शंका निरसनसाठी १९५० ही हेल्पलाईन सुरू केली आहे.

सुविधा ॲप

सुविधा ॲप हे निवडणूक काळात उमेदवारांना नामनिर्देशनाबरोबरच वेगवेगळ्या परवानग्या देण्यासाठी उपयुक्त ठरते. त्यानुसार उमेदवारांना प्रचारासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या मिळवण्यासाठी निवडणूक कार्यालयात फेऱ्या न मारता या ॲपच्या माध्यमातून सहजपणे परवान्यासाठी अर्ज करता येतो, त्याची स्थिती जाणून घेता येते.

1) सुविधा ॲपमुळे उमेदवाराची वेळेची आणि खर्चाची बचत होत आहे.

2) एकाच ठिकाणी सर्व प्रकारच्या परवानग्या काढता येतात.

सक्षम ॲप

सक्षम ॲपच्या माध्यमातून दिव्यांग मतदाराला सर्व सुविधा घरी बसून मिळवता येतात. त्यानुसार संबंधिताने या सेवेसाठी नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, मतदारसंघ नोंदवणे आवश्यक आहे. त्यामुळे आवश्यक ती मदत अधिकारी उपलब्ध करुन देऊ शकतात. मतदानाच्या दिवशी या माध्यमातून दिव्यांग व्यक्तीला करणे शक्य होते.

# कुटुंबामध्ये प्रेमभाव असणे गरजेचे!

१५मे हा जागतिक कुटुंबदिन म्हणून साजरा केला जातो. युनायटेड नेशन्स मध्ये सर्वात प्रथम जागतिक कुटुंबदिन म्हणून साजरा करण्यात आला.आज खऱ्या अर्थाने विचार केला तर एकत्र कुटुंब पद्धती क्वचित पहायला मिळते.विभक्त कुटुंब पद्धतीचे ट्रेड वाढत चालले आहे.आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये एकत्र कुटुंब पद्धतीस अनन्यसाधारण महत्त्व आहे.

एकीकडे छोटे कुटुंब व सुखी कुटुंब संस्कृतीचे प्रारुप वाढल्याचे दिसून येत आहे.कौटुंबिक स्वास्थ मिळणे दुरापास्त झाले आहे.आज आजी, आजोबा या कुटंब पद्धतीत क्वचीत पहायला मिळतात.आज कुटुंबामध्ये राहणारा प्रत्येक व्यक्ती हा महत्त्वाचा घटक आहे.संकटकाळात संपूर्ण कुटुंब एकत्र कुटुंब पद्धती एकजुटीने संकटाचा सामना करतात.

आज विभक्त कुटुंब पद्धती वाढताना दिसत आहे.ज्या घरात ,आजी, आजोबा,आई,वडील असतात .ते घर स्वर्ग मानले पाहिजे.मोठ्या पुण्याईने आपल्याला थोरा मोठ्यांचे आशीर्वाद मिळतात.कुटुंब टिकवण्यासाठी मुलांमध्ये संस्कारमुल्ये रूजवण्यासाठी आईची भूमिका महत्वपूर्ण असते. अत्यंत प्रतिकुल परीस्थीतीत आई वडील मुलांना घडवत असतात.आज छोट्याशा दुराव्यामुळे कोणाचीही साथ सोडता कामा नये.आज कुटुंबव्यवस्था टिकवण्यासाठी आपआपसात प्रेमभाव असणे गरजेचे आहे.

सर्वात महत्त्वाचे कुटुंबियांशी एकोपा ठेवा.एकमेकांशी संवाद साधा,मी पणा सोडुन द्या.कुटुंबात जिव्हाळा वाढण्यासाठी प्रेमभाव असावा.कुटुंबापेक्षा कोणतेही मोठे धन नाही .आईची माया,वडीलांची छाया,भावाचा हात, बहीणेचे प्रेम हे ज्या घरात असते.ते कुटुंब सुखी आहे.आपल्या कुटुंबात ऐक्य नेहमी टिकून राहण्यासाठी कुटुंबामध्ये प्रेमभाव असणे गरजेचे आहे.

**संतोष दत्तू शिंदे,**
**मु.पो.काष्टी,ता.श्रीगोंदा,**
**जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्र**

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## थोडक्यात



### निवडणुकीसाठी लागणारी मतदान यंत्रे मतदानाकरीता तयार करण्याची प्रक्रियेला सुरुवात

● कल्याण : लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात ठाणे जिल्ह्यात दि. २०मे रोजी मतदान होणार असून यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा तसेच निवडणूक यंत्रणा कार्यरत आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाकरीता मतदारनिहाय १९६०मतदान केंद्र असून, प्रत्येक विधानसभा मतदार संघाकरीता १२०% कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट आणि 130% VVPAT यंत्र मतदानाकरीता तयार करण्याची प्रक्रिया सहा विधानसभा मतदारसंघात १३ मे, १४ मे व आवश्यकतेनुसार दि. १५ मे रोजी करण्यात येणार आहे. केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) मनोज जैन यांनी समक्ष या प्रक्रियेची पाहणी केली. यावेळी कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते उपस्थित होत्या. सदरची प्रक्रिया ही उमेदवारांच्या प्रतिनिधींसमक्ष करण्यात येत आहे.

### संत निरंकारी मिशनच्या नेत्रचिकित्सा व मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबिरात २५० नागरिक लाभान्वित



● कल्याण : निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या 'नरसेवा नारायण पूजा' या शिकवणूकीला अनुसरुन संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने रविवारी संत निरंकारी सत्संग भवन, मुलुंड (पूर्व) येथे आयोजित मोफत नेत्रचिकित्सा व मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबिरात २५० नागरिक लाभान्वित झाले. या शिबिरामध्ये २६ रुग्णांना मोतीबिंदु असल्याचे आढळून आले व त्यांना के.बी. हाजी बच्चुअली चॅरिटेबल हॉस्पिटल, मुंबई येथे त्यांच्या शस्त्रक्रियेकरिता संदर्भित करण्यात आले. शिवाय १०८ रुग्णांना चश्मे वाटण्यात आले. उर्वरित रुग्णांच्या डोळयांची तपासणी करुन त्यांना डोळे निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक सल्ल्याबरोबर औषधांचेही वाटप करण्यात आले. या शिबिरात नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाईंड आणि आर.ए.पोदार आयुर्वेद मेडिकल कॉलेल, वरळी, मुंबई येथील नेत्र चिकित्सकांनी आपल्या निष्काम सेवा बहाल केल्या. या शिबिराचे उद्घाटन मंडळाचे स्थानिक सेक्टर संयोजक श्रीधर पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या प्रेमा ओबेरॉय यांच्या देखरेखीखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये स्थानिक सेवादल युनिट आणि एसएनसीएफच्या स्वयंसेवकांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

### माथेरान मद्ये ६६% मतदान

● माथेरान - : राज्यातील लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातील ११ मतदारसंघात आज सकाळपासून मतदानाला सूरुवात झाली असून माथेरान मधे सरासरी ६६ टक्के मतदान झाले आहे. चौथ्या टप्प्यातील एकूण ११ लोकसभा मतदानास आज सकाळी सुरवात झाली असली तरी मावळ मतदान केंद्रात एकून चौतीस उमेदवार रिंगणात उतरले असली तरी शिवसेना विरुद्ध शिवसेना अशीच खरी रंगत असणार आहे, मावळ मतदार संघ रायगड ते पुण्या पर्यंत विभागलेल्या मतदार संघात पनवेल कर्जत उरण मावळ चिंचवड पिपरी असे ६ विधानसभा मतदान संघ येतात. मावळ मतदान केंद्रात पहिल्यांदाच निवडणूक चिन्ह वेगळे असले तरी एकाच पक्षाचा नावाने निवडणुक चुरशीची होताना दिसत आहे, माथेरान मधे नागरिकानी मतदानास उस्फुर्त पणे मतदानाचा हक्क बजावला हया वेळी अनेक तरुण वर्गांचे मतदानात पहिल्यांदाच हक्क बजावताना एक वेगळा आनंद उस्ताह आणि मतदान झाल्यावर आपल्या बोटाचे सेल्फी काढून सोशल मीडियावर टाकून आपला आनंद व्यक्त करत होते, तर अनेकांनी आपल्या घरातील वयोवृद्ध आई-वडिलांना खुर्चीत घेऊन आणून मतदानाचे कर्तव्य पार पाडले, तर सायंकाळीं पावसाने हजेरी लावल्याने काही काळ मतदाराची चांगलीच तारांबळ उडाली,कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सहायक पोलिस निरीक्षक अनिल सोसणे यांनी अतिरिक्त पोलिस कुमक मागवून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याने निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडली.

# कल्याण-मुरबाड रेल्वेमार्ग पूर्ण करून नगरपर्यंत नेणार : देवेंद्र फडणवीस

## कपिल पाटील यांच्या प्रचारासाठी मुरबाडमध्ये महायुतीचा कार्यकर्ता मेळावा !



● मुरबाड - देशात मोदी सरकारच्या स्थापनेनंतरच कल्याण-मुरबाड रेल्वे प्रकल्पाला मंजुरी मिळाली. या प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात ९०० कोटींची तरतूद केली असून, कल्याण-मुरबाड रेल्वेमार्ग आता कोणीही थांबवू शकत नाही. पुढील टप्प्यात नगरपर्यंत रेल्वेमार्ग मंजूर केला जाईल, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले. त्याचबरोबर भिवंडी लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या विजयासाठी आमदार किसन कथोरेंसह महायुतीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते जीवाचे रान करतील, हा देवेंद्र फडणवीस यांचा शब्द आहे. मुरबाड मतदारसंघात विक्रमी मताधिक्य मिळेल, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुरबाड येथे महायुतीच्या प्रमुख कार्यकर्त्यांचा मेळावा आज पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी महायुतीचे उमेदवार कपिल पाटील, आमदार किसन कथोरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी खासदार जगन्नाथ पाटील, शिवसेनेचे उपनेते प्रकाश पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते प्रमोद हिंदुराव, शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख सुभाष पवार, अरविंद मोरे, मनसेचे लोकसभा प्रमुख शैलेश बिडवी, कुणबी सेनेचे विश्वनाथ पाटील, आरपीआयचे मेहबुब पैठणकर, संजय गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य उल्हास बांगर, माजी उपसभापती रामभाऊ बांगर आदींसह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे कल्याण-मुरबाड रेल्वे मंजूर झाली. मात्र, महाविकास आघाडी सरकारच्या काळात अडीच वर्ष सर्व रेल्वे प्रकल्पांना राज्य सरकारने ५० टक्के निधी दिला नाही. त्यामुळे कल्याण-मुरबाड रेल्वेसह सर्व रेल्वे प्रकल्पांची कामे रखडली होती. महायुतीचे सरकार स्थापन झाल्यावर तिसऱ्याच दिवशी मुरबाड रेल्वे प्रकल्पाला निधीची हमी देण्याचे पत्र घेऊन खासदार कपिल पाटील दिल्लीला गेले होते. या प्रकल्पासाठी केंद्रीय अर्थसंकल्पातही तरतूद झाली असून, आता रेल्वे प्रकल्प पूर्ण होण्यास कोणीही थांबवू शकत नाही. मुरबाडहून नगरपर्यंत रेल्वेमार्ग मंजूर केला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

भिवंडी लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक विकासाची कामे झाली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला, असे नमूद करीत देवेंद्र फडणवीस म्हणाले, या सभेतील व्यासपीठावर कपिल पाटील व किसन कथोरे माझ्या डाव्या-उजव्या बाजूला आहेत. मात्र, मी कधीही भेद करीत नसून, ते माझे डावे-उजवे नाहीत. तर दोन डोळे आहेत. या मतदारसंघात महायुतीच्या विजयासाठी किसन कथोरे जीवाचे रान करतील. तसेच सर्वांनी एकत्रपणे काम केल्यानंतर मुरबाड मतदारसंघातून सर्वाधिक मताधिक्य मिळेल, असा विश्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

■ भिवंडी लोकसभा मतदारसंघाची १० वर्षांत विकासाच्या दिशेने यशस्वी वाटचाल सुरू झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारबरोबरच महायुती सरकार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी दिला. त्यामुळे भिवंडी लोकसभा मतदारसंघाबरोबरच मुरबाड विधानसभा मतदारसंघात विकासकामे झाली. यापुढील काळात मुरबाडच्या सर्वांगीण विकासासाठी मुरबाड विधानसभा मतदारसंघाचा समावेश एमएमआरडीएमध्ये करावा, अशी मागणी कपिल पाटील यांनी केली. आपण टीकेला विकासाने उत्तर दिले. परंतु, सध्या विरोधी पक्षातील उमेदवाराकडून धमक्या दिल्या जात असून, कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण केला जात आहे. कार्यकर्त्यांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहन कपिल पाटील यांनी केले.

■ यंदाची निवडणूक ही देशाची असून, जातीपातीच्या नावावर नको, तर विकासाच्या नावाने कार्य करू या, असे आवाहन आमदार किसन कथोरे यांनी केले. तसेच आपल्या नावाने दिशाभूल करणारे व्हॉट्स ॲप मेसेज दिले जात आहेत. या बनावट मेसेजवर विश्वास ठेवू नये. कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नये, असे नमूद करीत महायुतीचे उमेदवार कपिल पाटील यांच्या खांद्याला खांदा लावून कार्यकर्ते काम करतील. कोणीही कितीही वल्गना केल्या तरी, मुरबाडमधून कपिल पाटील यांना गेल्या निवडणुकीपेक्षा सर्वाधिक मताधिक्य दिले जाईल, अशी ग्वाही आमदार कथोरे यांनी दिली. प्रत्येक कार्यकर्त्याने बूथचा अभ्यास करून जास्तीत जास्त मतदान करून घ्यावे, अशी सूचना त्यांनी केली. या वेळी प्रमोद हिंदुराव, सुभाष पवार यांचीही भाषणे झाली.

## जिजाऊच्या निलेश सांबरे यांच्या विजय निर्धार यात्रेत भर पावसातही गर्दी !



● मुरबाड - भिवंडी लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांच्या विजय निर्धार यात्रेची सध्या जोरदार चर्चा असून सलग सहाव्या दिवशी देखील कल्याण ग्रामीण मधील विविध भागात लोकांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद पाह्यला मिळाला . ठिकठीकाणी निलेश सांबरे यांचे अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले. फळेगावात पोचल्यानंतर टाळ-मृदुंगाच्या गजरात निर्धार यात्रेचे येथील ग्रामस्थांनी स्वागत केले गेले. या उत्स्फूर्त प्रतिसादाने आपण भारावून गेलो असून हा विश्वासच माझा विजय निश्चित करेल अश्या भावना सांबरे यांनी व्यक्त केल्या .

निलेश सांबरे यांची विजय निर्धार यात्रा सोमवारी सकाळी कल्याण मधील रायता येथून सुरु झाली. त्यानंतर गोवेली, घोटसई, रुंदे मार्गे फळेगाव येथे पोचली. फळेगावातील नागरिकांनी निर्धार यात्रेचे टाळ-मृदुंगाच्या गजरात भजन गात गात मोठ्या उत्साहाने स्वागत केले. तसेच घोटसई मधील पंचशील नगर येथे निलेश सांबरेंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन केले. यावेळी निलेश सांबरे यांच्यासाठी जोरदार घोषणा देण्यात आल्या.

दानबाव, नडगाव मार्गे खडवली विभागात ही यात्रा पोहचल्यानंतर अचानक पावसाने हजेरी लावली. जोरदार पाऊस आणि वाऱ्यातही अनेक नागरिक सांबरे यांना भेटण्यासाठी गर्दी करून उपस्थित होते. या गर्दीत सांबरे यांना भेटण्यासाठी एक दिव्यांग बांधव भर पावसात थांबला होता. सांबरे यांना हे समजताच त्यांनी अगदी आपुलकीने या दिव्यांग बांधवाशी संवाद साधला . या भेटीनंतर त्या दिव्यांग बांधवाने "आम्ही सर्व सदैव तुमच्यासोबत असू !!!" असा सांबरे यांना विश्वास दिला . सांबरे यांच्या विजय निर्धार यात्रेला मिळत असलेला प्रचंड प्रतिसाद हा सध्या सगळयांच्या चर्चेचा विषय ठरला आहे .

## मुंबईकरांना IMD चा इशारा! पुढील 3 ते 4 तासांत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

● मुंबई- सोमवारी मुंबई शहर, उपनगर आणि नवी मुंबईत आलेला पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. त्यातच भारतीय हवामान विभागाने मंगळवारी मुंबईसाठी इशारा जारी केला आहे. पुढील तीन ते चार तासात मुंबईत सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच मध्यम पाऊस आणि विजा कडाडण्याची शक्यता आहे.

पुढील तीन ते चार तास खबरदारी घेण्याचा सल्ला आयएमडीने मुंबईकरांना दिला आहे. आयएमडीने सांगितलंय की, ४०-५० किमोमीटर प्रति तास या गतीने वारे वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे घराच्या बाहेर पडणाऱ्या लोकांनी काळजी घ्यावी. तसेच आवश्यक असेल तरच घराबाहेर पडावे. वादळी वाऱ्यांसह पाऊस आणि आकाशात विजा चमकणार आहेत. मुंबई



आणि उपनगरातील बंदिस्त भागांमध्ये जोराच्या वाऱ्याचा प्रभाव जास्त पाहायला मिळणार आहे. सोमवारी सायंकाळी चारच्या सुमाराज मुंबई आणि उपनगरामध्ये वादळी वारे आणि मुसळधार पावसाला सुरुवात झाली होती. त्यामुळे लोकांची तारांबळ उडाली. शिवाय काही ठिकाणी अपघाताच्या घटना देखील घडल्या. घाटकोपर येथे जवळपास १२०*१२० महाकाय आकाराचे जाहिरातीचे फलक पेट्रोल पंपावर कोसळले. त्यामुळे मोठी जीवितहानी झाली.

## आगरी कोंढरीपाडा ग्रामस्थांचा मतदानावर बहिष्कार

● उरण - दिनांक ६ मे २०२३ रोजी उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील आगरी कोंढरीपाडा येथे श्री हनुमान मंदिरात श्री हनुमान मूर्तीची विटंबना झाली ही विटंबना गावात राहणाऱ्या भालचंद्र नारायण पाटील या समाजकंटकाने केली होती. सदर इसमावर उरण पोलीस ठाण्यात त्याने केलेल्या गुन्हयाबाबत रीतसर एफ.आय.आर देखील नोंदविण्यात आले. मात्र राजकीय हस्तक्षेपामुळे सदर इसमावर कोणतेही कायदेशीर कारवाई झाली नाही. सदर इसमावर कठोरात कठोर कारवाई व्हायला पाहिजे होती. मात्र प्रत्यक्षात तसे झाली नाही. त्यामूळे संतप्त ग्रामस्थांनी मतदानाच्या दिवशीच म्हणजेच



१३ मे २०२४ रोजी मतदानावरच जाहीर बहिष्कार घातला आहे. याबाबत सदर सर्व ग्रामस्थ हनुमान मंदिरात एकत्र आले होते.

घडलेल्या घटनाबाबत सदर आरोपीवर कोणतेही कठोर कायदेशीर कारवाई झालेली नाही. जर आरोपीवर कारवाई झाली नाही तर लोकसभा निवडणुकीवर जसे बहिष्कार टाकले तसेच बहिष्कार विधानसभेच्या निवडणूकीवरही घालण्यात येणार आहे.असे मत आगरी कोंढरी पाडा ग्रामस्थ मंडळाचे सचिव कृष्णा पाटील यांनी दिली. तर उपाध्यक्ष धनेश म्हात्रे यांनीही याबाबत आक्रमक भूमिका घेत जोपर्यंत ग्रामस्थांना न्याय मिळत नाही,ग्रामस्थांच्या मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत हा लढा असाच सुरु राहणार असल्याचे सांगितले. उपस्थित महिला ग्रामस्थ पल्लवी ठाकूर यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की आमचे ग्रामस्थांचे १७०० मतदान आहे. आम्हाला न्याय न मिळाल्याने तसेच कोणत्याही राजकीय पक्षाच्या पदाधिका-यांनी लक्ष दिले नसल्याने आम्ही मतदान करणार नाही. हे असेच चालू राहिले तर १७०० मतदार पुढील विधानसभेच्या निवडणूकीत मतदान करणार नाहीत अशी माहिती पल्लवी ठाकूर यांनी दिली. सदर बहिष्कार बाबत गावातील सर्व ग्रामस्थ आगरी कोंढरीपाडा येथील श्री हनुमान मंदिरात एकत्र आले होते. यावेळी सर्वांनी एकमुखी निर्णय घेत मतदानावर बहिष्कार घातला आहे.

## केडीएमसी क्षेत्रातील होर्डींग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे पालिकेचे निर्देश

### केडीएमसी कडून १८२ अधिकृत होर्डींग्जला परवानगी

● कल्याण : घाटकोपर येथे होर्डींग्ज पडून झालेल्या दुर्घटनेनंतर कल्याण डोंबिवली क्षेत्रातील होर्डींग्जचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. केडीएमसी कडून १८२ अधिकृत होर्डिंग्जला परवानगी असून याबाबत सुरक्षेचा उपाय म्हणून केडीएमसी क्षेत्रातील होर्डींग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देश कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे उपायुक्त धैर्यशील जाधव यांनी दिले आहेत.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्राचे कल्याण व डोबिवली असे दोन विभाग आहेत. महापालिका ही विकसित महापालिका आहे. त्याअनुषंगाने, मालमत्ता विभागाकडुन महापालिकाक्षेत्रात एकुण १८२ इतक्या अधिकृत होर्डिग्जला मालमत्ता विभागाकडुन परवानगी देणेत आलेली आहे. मान्सुन पुर्व कालावधीत होणा-या दुर्घटना टाळण्यासाठी तसेच घाटकोपर येथे जाहिरात फलक कोसळल्याची घटना घडलेली आहे. मान्सुन पुर्व कालावधीत जीवित हानी टाळण्यासाठी उपायोजना करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने शासनाने दिलेल्या निर्देशान्वये कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागामार्फत कारवाई करुन सर्व धोकादायक तसेच अतिधोकादायक रचनात्मक तपासणी करुन निष्काशनाची कारवाई करण्यात येणार आहे.

ज्या अधिकृत होर्डीग्ज आहेत त्यांच्या मालकांनी येत्या १५ दिवसात स्ट्रक्चरल ऑडिट करून तसा अहवाल केडीएमसीकडे तातडीने सादर करण्याच्या सुचना संबंधितांना दिल्या आहेत.

## मतदानाच्या प्रचारासाठी नवी मुंबईत फिरताहेत लक्षवेधी ग्रीन मॅस्कॉट्स



● नवी मुंबई - २५ ठाणे लोकसभा निवडणूकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढावी या दृष्टीने स्वीप कार्यक्रमांतर्गत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार विविध प्रसार माध्यमांचा वापर केला जात आहे. यामध्ये मतदान यंत्राचे मुखवटे अर्थात शुभंकर (मॅस्कॉट्स) तयार करण्यात आले असून हे चार मॅस्कॉट्स संपूर्ण महापालिका क्षेत्रात फिरुन २० मे रोजी होणाऱ्या ठाणे लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याविषयी जनजागृती करत आहेत.

हिरव्या फ्लुरोसन्ट रंगात चटकन नजरेत भरणारे हे मोठया आकाराचे चार मॅस्कॉट्स लक्षवेधी असून या मॅस्कॉटच्या पुढील भागावर मतदान यंत्राची प्रतिकृती आहे. त्याचप्रमाणे पाठीवरील मागील भागात मतदान करण्याविषयी आवाहन करणारा फलक प्रदर्शित करण्यात आला असून त्यावर वोटर हेल्पलाईन ॲपचा क्यूआर कोड नमूद करण्यात आलेला आहे. हे मॅस्कॉट्स नागरिकांमध्ये व त्यातही मुलांमध्ये लोकप्रिय होत असून अनेकजण या मॅस्कॉटसोबत सेल्फी छायाचित्र काढून आपापल्या सोशल मिडीया अकाऊंटवरुन प्रदर्शित करीत आहेत. महापालिका निवडणुक विभागाचे उप आयुक्त श्री. शरद पवार यांच्या नियंत्रणाखाली या मॅस्कॉट्समार्फत मतदान जनजागृती प्रचार वेळापत्रक तयार करण्यात आले असून प्रत्येक मॅस्कॉटला विभाग नेमून देण्यात आलेला आहे. संबंधित विभागांचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांचे मॅस्कॉट्सव्दारे जनजागृती कार्यावर लक्ष असणार आहे. पथनाट्यांप्रमाणेच लक्ष वेधून घेणाऱ्या मॅस्कॉट्सव्दारे लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याचे आवाहन करणाऱ्या स्वीप उपक्रमास नागरिकांची पसंती मिळताना दिसत आहे.

## फ्लॅश मॉबव्दारे मॉलमध्ये मतदार जनजागृती

● नवी मुंबई - लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीत मतदानाचा अधिकार असणा-या नागरिकांनी मतदान करुन मतदानाचा हक्क बजावावा याकरिता स्वीप कार्यक्रमांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृतीपर विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

यामध्ये नुकताच मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झालेले पहिल्यांदाच मतदान करणारे १८ वर्षावरील युवक व युवती यांना मतदान करण्याकरीता प्रोत्साहित केले जात असून महाविद्यालयांमध्ये तसेच युवक संघटनांमध्येही मतदार जनजागृती विषयक उपक्रमांवर भर दिला जात आहे.

या अनुषंगाने शनिवार व रविवारी होणारी मॉलमध्ये येणारी नागरिकांची गर्दी लक्षात घेऊन वाशी येथील इनॉर्बीट मॉल तसेच सीवूड येथील ग्रॅंड सेंट्रल मॉल या दोन ठिकाणी लोकांना चटकन आकर्षित करुन घेणा-या फ्लॅश मॉब सारख्या संगीतमय कलाप्रकाराचा मतदार जनजागृतीसाठी प्रभावी वापर करण्यात आला.

मॉलमधील वातावरण खरेदीसाठी उत्साही असताना



व तशा प्रकारची लगबग मॉलमधील प्रत्येक दुकानातून सुरु असताना अचानक मोठया आवाजात गीत - संगीत वाजायला सुरुवात होते. गाणे कुठे वाजते आहे याचा कानोसा घेत लोक आवाजाच्या दिशेने सूरांचा शोध घेण्यासाठी पुढे येतात. त्यावेळी त्यांना मॉलच्या तळमजल्यावर मधल्या मोकळया पॅसेजमध्ये संगीत वाजायला सुरुवात झाल्याचे लक्षात येते व त्या तालावर नृत्यासाठी सज्ज असलेले तरुण, तरुणी दिसतात. गाणे वाजायला सुरुवात होते आणि त्या तालावर ते तरुण - तरुणी समुहनृत्य सुरू करतात. बघता बघता हे नृत्य पाहण्यासाठी त्यांच्या भोवतालची गर्दी वाढत जाते. सुरूवातीच्या गाण्यानंतर चक्क मतदान विषयक जनजागृती करणारे गाणे सुरू होते. मग मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करणारी गाणी एकापाठोपाठ एक नृत्यासह सादर होत जातात. तळमजल्यावरच नव्हे तर मॉलमधल्या प्रत्येक मजल्याच्या कठडयाजवळ येऊन नागरिक तळमजल्यावर नृत्य करणा-या कलावंताकडे आकर्षित होऊन गर्दी करतात. नृत्याविष्काराच्या अखेरीस २०मे रोजी होणा-या ठाणे लोकसभा निवडणूकीत प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन मतदान करण्याविषयीचे फलक उंचावत केले जाते. नागरिकही या तरुणाईला प्रतिसाद देत टाळयांच्या गजरात त्यांच्या नृत्याचे कौतुक करतात व लोकसभा निवडणूकीत आम्ही मतदान करणार आहोत अशी ग्वाही देखील देतात.

वर्दळीच्या ठिकाणी अचानक सुरु होणारा गीतसंगीतमय फ्लॅश मॉब हा नागरिकांना आकर्षित करणारा व त्याच वेळी मतदानाविषयी जनजागृती करणारा असल्याने हा उपक्रम सर्वार्थाने यशस्वी झाला.

# हार्दिकला येताना पाहताच रोहित-सूर्या-तिलक उठून गेले?



आयपीएलचा चॅम्पियन संघ मुंबई इंडियन्स यंदाच्या हंगामातून बाहेर होणारा पहिला संघ ठरला. यंदाच्या हंगामात संघाची कामगिरी फारच सुमार दर्जाची राहिली आहे. आयपीएल सुरू होण्यापूर्वी मुंबई संघ व्यवस्थापनाने संघाचा कर्णधार बदलण्याचा मोठा निर्णय घेतला, ज्याचा त्यांना संपूर्ण हंगामात फटका बसला. मुंबई इंडियन्सच्या संघात फूट पडल्याची चर्चा क्रिकेट वर्तुळात सुरू होती, अनेक दिग्गजांनी यावर आपली मते मांडली होती. पण संघाचा कर्णधार बदलल्याचे पडसाद अजूनही उमटताना दिसत आहेत.

आयपीएल सुरू होण्यापूर्वी रोहित शर्माच्या जागी हार्दिक पंड्याला संघाचा नवा कर्णधार बनवण्यात आले होते, तेव्हापासून चाहते हार्दिकवर टीका करत आहेत. त्याचबरोबर मुंबई इंडियन्स कॅम्पची दोन गटात विभागणी झाल्याचेही काही रिपोर्टमध्ये समोर आले आहे. त्याचवेळी, दैनिक जागरणच्या वृत्तानुसार, केकेआरविरुद्धच्या सामन्याच्या पूर्वसंध्येला सराव सत्रादरम्यान रोहित फलंदाजीचा सराव करत होता, त्यावेळी हार्दिक पंड्या उपस्थित नव्हता. त्याचवेळी हार्दिक सरावासाठी आला असता रोहित आणि सूर्या त्याला टाळून मैदानाच्या बाहेर गेले. रोहित आणि सूर्याशिवाय तिलक वर्माही त्यांच्यासोबत होता. अशा परिस्थितीत रोहित आणि हार्दिक यांच्यातील मतभेदाचे मुद्दे पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत.

दुसरीकडे, केकेआरच्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ देखील पोस्ट करण्यात आला होता. ज्यामध्ये रोहित शर्माने अशा काही गोष्टींचा उल्लेख केला की ज्या ऐकल्यानंतर चाहत्यांना समजले आहे की रोहित आणि मुंबई इंडियन्सच्या कॅम्पमध्ये नक्कीच काहीतरी बिनसलं आहे. रोहित केकेआरचे सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर यांच्याशी बोलत होता आणि समोर आलेल्या व्हिडिओमध्ये रोहित सांगताना दिसत आहे की एकेक गोष्ट बदलत आहे, हे मी बांधलेलं मंदिर आहे. पण मला पर्वा नाही, हे माझं शेवटचं आहे.

मुंबई इंडियन्सची कामगिरी यंदाच्या मोसमात खूपच खराब होती. आयपीएलच्या इतिहासातील सर्वात यशस्वी आणि सर्वाधिक फॉलो केला जाणारा संघ या स्पर्धेत बाहेर होणारा सर्वात पहिला संघ ठरला. अजून संघाचा फक्त एक सामना बाकी असताना, मुंबईचा संघ आठ गुणांवर पोहोचला आहे आणि ९व्या स्थानावर आहे. मुंबईला घरचे मैदान सोडून इतर मैदानांवर खेळताना फक्त एकाच सामन्यात विजय मिळवला आला आहे.मुंबई इंडियन्सच्या ताफ्यातील या मुद्द्याशिवाय टी-२० विश्वचषक २०२४ संबंधित संघनिवडीवर एक अहवाल समोर आला आहे.

# 'राजा राणीची ग जोडी' फेम अभिनेत्री, नितीश चव्हाणच्या 'लाखात एक आमचा दादा' नव्या मालिकेत झळकणार




'झी मराठी' वाहिनीवर लवकरच 'लाखात एक आमचा दादा' मालिकाचा प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. १० मेला अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर 'झी मराठी' वाहिनीने या नव्या मालिकेची घोषणा केली. सोशल मीडियावर 'लाखात एक आमचा दादा' या नव्या मालिकेचा दमदार प्रोमो शेअर करत प्रेक्षकांना आनंदाची बातमी दिली. विशेष म्हणजे नव्या मालिकेत 'झी मराठी'चा जुना व लोकप्रिय चेहरा म्हणजे अभिनेता नितीश चव्हाण प्रमुख भूमिकेत पाहायला मिळणार आहे. शिवाय 'लाखात एक आमचा दादा' नव्या मालिकेत नितीशबरोबर अफेअरच्या चर्चा रंगलेली अभिनेत्री दिसणार असल्याचं समोर आलं आहे.

'लागिरं झालं जी' मालिकेतून घराघरात पोहोचलेला अजय उर्फ अज्या म्हणजेच अभिनेता नितीश चव्हाण पाच वर्षांनंतर नव्या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. 'लाखात एक आमचा दादा' मालिकेत नितीश प्रमुख भूमिका साकारणार आहे. तसंच या मालिकेत 'लागिरं झालं जी' मालिकेतील आणखी एक अभिनेता पाहायला मिळणार आहे. 'टॅलेंट' म्हणजेच अभिनेता महेश जाधव 'झी मराठी'च्या नव्या मालिकेत झळकणार आहे. याशिवाय 'राजा रानीची गं जोडी' फेम अभिनेत्री देखील नितीशच्या आगामी मालिकेत पाहायला मिळणार आहे.

'राजा रानीची गं जोडी' मालिकेतील संजीवनीची मैत्रीण आणि 'मन झालं बाजिंद' मधील कृष्णा म्हणजेच अभिनेत्री श्वेता खरात 'लाखात एक आमचा दादा' दिसणार आहे. यासंदर्भात 'मराठी टीव्ही इन्फो' इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करण्यात आली आहे. 'लाखात एक आमचा दादा' नव्या मालिकेत नितीश व श्वेता यांची ही नवी जोडी पाहायला मिळणार आहे.

दरम्यान, काही वर्षांपूर्वी नितीश व श्वेताच्या सोशल मीडियावरील रील व पोस्टमुळे दोघांच्या अफेअरच्या चर्चांणा उधाण आलं होतं. पण दोघांनी आपल्यात मैत्रीचं चांगलं नातं असल्याचं सांगितलं होतं. श्वेताच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, ती 'राजा रानीची गं जोडी' आणि 'मन झालं बाजिंद'नंतर 'सन मराठी'वरील 'सुंदरी' मालिकेत पाहायला मिळाली. या मालिकेत तिने सियाची भूमिका साकारली होती. शिवाय तिने बऱ्याच अल्बम सॉंगमध्ये काम केलं आहे.

# अक्षय कुमारने केलेली ट्विंकलची गायीशी तुलना





अभिनेत्री ट्विंकल खन्नाने नुकत्याच पार पडलेल्या मातृदिनाबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. १२ मे रोजी जगभरात मातृदिन साजरा झाला. बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी सोशल मीडियावर त्यांचा आईचा फोटो शेअर करत त्यांना शुभेच्छा दिल्या. लेखिका आणि उद्योजिका ट्विंकल खन्नानेदेखील तिच्या आईसाठी 'मिसेस फनीबोन्स' या तिच्या कॉलमच्या आवृत्तीमध्ये लिहिलं आहे.

ट्विंकलच्या बालपणापासून ते पालकत्वापर्यंतच्या प्रवासापर्यंतच्या आईच्या भूमिकांबद्दल तिने यात उल्लेख केला आहे. ट्विंकल खन्नाची आई डिंपल कपाडियाचा उल्लेख करत ट्विंकलने लिहिलं की, "आईची मोठी ड्यूटी ही असायची की ती मी आणि माझी बहिण रिंकीने दोन पोळ्या खाल्ल्या आहेत की नाही, आणि दोघांच्या केसांची नीट वेणी घातली गेली आहे की नाही याकडे लक्ष देणं."

ट्विंकलने तिच्या 'टाईम्स ऑफ इंडिया'च्या कॉलममध्ये लिहिताना, तिच्या आईला एक मॉडर्न आई असं म्हटलं आहे. आईला एक थेरपिस्ट, इव्हेंट प्लॅनर, स्टायलिस्ट, शिक्षक अशा अनेक प्रकारचं काम कराव लागलं. असंही तिने नमूद केलंय.

आईपणाबद्दल सांगताना ट्विंकलने तिचा अनुभवदेखील शेअर केला. एकदा अक्षय कुमारने एकदा तिची तुलना गायीशी केली होती, असं ट्विंकलने सांगितलं. २००२ मध्ये ट्विंकलने मुलगा आरवला जन्म दिला होता. एकेदिवशी कोणीतरी घरी भेटायला आलं होतं. त्यांनी अक्षयला ट्विंकल कुठे आहे? असं विचारलं. त्यावर अक्षय म्हणाला होता की, ती सध्या इथे नाहीये, कारण ती दूध देत आहे. त्याने स्तनपान करतेय ऐवजी दूध देतेय असं म्हटलं आणि लगेच त्याने माझ्यासारख्या हॉट मुलीला अप्रत्यक्षपणे गाय म्हटलं, असं ट्विंकल थट्टा करत म्हणाली.

ट्विंकलने मॉडर्न मातांना होणाऱ्या अनेक संघर्षांबद्दलही सविस्तर यात लिहिलं आहे. स्वत:च करिअर सांभाळून माता हा विचार करत असतात की आपलं मूल चांगलं संस्कार घेऊन मोठं होतंय ना. धावपळीच्या जिवनातही त्यांच सतत त्यांच्या मुलांकडे लक्ष असतं. एखाद्या बबल रॅपमध्ये गुंडाळल्यासारख आणि संघर्षाशिवाय असलेलं जीवन आजच्या मातांना मुलांना द्यायचं असतं. पण वास्तविक जीवनात कठीण गोष्टींचा अनुभव घेणही तितकंच गरजेच असतं.

दरम्यान, ट्विंकल खन्नाबद्दल सांगायचं झालं तर १९९५ रोजी प्रदर्शित झालेल्या 'बरसात' या चित्रपटाद्वारे ट्विंकलने सिनेसृष्टीत पदार्पण केलं. त्यानंतर अनेक सिनेमे करत ट्विंकलने प्रसिद्धी मिळवली. १७ जानेवारी २००१ रोजी ट्विंकल खन्ना आणि अक्षय कुमार लग्नबंधनात अडकले. अभिनयाबरोबरच ट्विंकल उत्तम लेखिका असल्याने २०१५ साली 'मिसेज फनीबोन्स' हे पहिलं पुस्तक ट्विंकलने प्रकाशित केलं.

# मैदानातील खडाजंगीनंतर लखनौचे मालक संजीव गोयंकाकडून केएल राहुलला जेवणाचं आवतन







लखनौ सुपरजायंटस टीमचे मालक संजीव गोयंका हे गेल्या काही दिवसांपासून टीकेचे धनी झाले आहेत. ८ मे रोजी लखनौ सुपर जायंट्सचा (LSG) सामना सनरायझर्स हैदराबादशी (SRH) झाला होता. प्रथम फलंदाजी करताना एलएसजीने १६५ धावा केल्या होत्या. मात्र एसआरएचने एकही गडी न गमावता अवघ्या ९.४ षटकात सामना खिशात घातला. त्यानंतर टीमचे मालक संजीव गोयंका यांनी कर्णधार केएल राहुलशी मैदानातच वादावादी केली होती. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर चहुबाजूंनी संजीय गोयंका यांच्यावर टीका करण्यात आली. यानंतर आज एलएसजीचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी (DC) होत आहे. या सामन्याच्या पूर्वसंध्येला गोयंका यांनी केएल राहुलला आपल्या घरी जेवणाचे निमंत्रण दिले होते.

पॉईंट्स टेबलवर एलएसजीचा संघ सातव्या स्थानावर तर डीसीचा संघ सहाव्या स्थानावर आहे. दोन्ही संघाने १२ अंकाची कमाई आतापर्यंत केली आहे. एलएसजीने आजचा सामना जिंकला तर त्यांना १६ अंक मिळविण्याची संधी आहे. तर दुसरीकडे डीसीचा हा शेवटचा सामना असल्यामुळे त्यांच्यासाठी ही करो या मरोची लढाई आहे. दरम्यान गोयंका यांनी या महत्त्वाच्या सामन्यापूर्वी कर्णधार केएल राहुलला जेवणाचे निमंत्रण देऊन एकप्रकारे वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला असून संघातही यानिमित्ताने सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे.

केएल राहुल लखनऊची साथ सोडणार? LSGचे मालक संजीव गोयंका यांच्याबरोबरचा VIDEO व्हायरल झाल्यांनंतर चर्चांना उधाण

संजीव गोयंका आणि केएल राहुल यांच्या या भेटीचे फोटो आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. केएल राहुल गोयंका यांच्याशी हस्तांदोलन करताना आणि गळाभेट करताना दिसत आहे. एलएसजीला या हंगामात क्लालिफाय व्हायचे असेल तर उरलेले दोन्ही सामने चांगल्या रन रेटने जिंकावे लागणार आहेत. दिल्लीच्या अरूण जेटली स्टेडियमवर होणाऱ्या आजच्या सामन्यात त्यांच्यासाठीही करो या मरोची स्थिती असणार आहे.

लखनौ सुपर जायंट्सचे सहाय्यक प्रशिक्षक लान्स क्लुसनर यांनी गोयंका आणि केएल राहुलचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर त्यावर प्रतिक्रिया दिली होती. "दोघांच्या चर्चेमध्ये मला कोणतीही अडचण दिसत नाही. त्यामुळे आमच्यासाठी हे फक्त चहाच्या पेल्यातील वादळ आहे, असे मला वाटते. क्रिकेटवर उत्साहाने, ऊर्जेने केलेली चर्चा आम्हाला नेहमीच आवडते. मला वाटतं की अशा प्रकारे संघ चांगले होतात. आमच्यासाठी ही फार मोठी गोष्ट नाही."

दरम्यान संजीव गोयंका यांच्या वर्तनामुळे केएल राहुल नाराज असून तो पुढील हंगामात संघ सोडणार असल्याचेही बोलले गेले. संजीव गोयंका यांचे क्रिकेटमधील निर्णय याआधीही वादग्रस्त ठरले आहेत. पुणे रायझिंग सुपर जायंट्सचे सह-मालक असताना त्यांनी एमएस धोनीला संघाच्या कर्णधार पदावरून बाजूला केले होते.

## दिनविशेष

### घटना

२०२२: भारताने गहू निर्यातीवर तात्काळ बंदी घातली. उष्णतेच्या लाटेमुळे उत्पादन अंदाजापेक्षा कमी झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. १९९७: इंदिरा गांधी भारतीय मिहिला विकास सहकारी साखर कारखाना - देशातील आणि महाराष्ट्रातील पहिल्या महिला सहकारी साखर कारखान्याची सुरुवात नोंदणी झाली.

१९६३ : कुवेत - देशाचा संयुक्त राष्ट्रसंघात प्रवेश.

१९६०: एअर इंडिया - कंपनीची मुंबई ते न्यूयॉर्क विमानसेवा सुरू झाली.

१९५५: वॉर्सा करार - सोविएत रशिया, अल्बानिया, बल्गेरिया, झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, पोलंड, रुमानिया आणि पूर्व जर्मनी या कम्युनिस्ट राष्ट्रांचा वीस वर्षांचा परस्पर संरक्षणासाठीचा वॉर्सा करार पोलंडमधील वॉर्सा येथे झाला.

### जन्म

१९९८: तरुणी सचदेव - लोकप्रसिध्द पेय रसनाच्या जाहिरातीतील बालकलाकार (निधन : १४ मे २०१२ ) १९८४ : मार्क झुकरबर्ग - फेसबुकचे सहसंस्थापक

१९८१ : प्रणव मिस्त्री भारतीय संगणक शास्त्रज्ञ

१९२६: डॉ. इंदुताई पटवर्धन - भारतीय समाजसेविका व आनंदग्रामच्या संस्थापिका (निधन: ८ फेब्रुवारी १९९९)

१९२२: फ्रांजो तुममन - क्रोएशिया देशाचे पहिले अध्यक्ष (निधन: १० डिसेंबर १९९९)

१९०९: वसंत शिंदे - विनोदसम्राट - कलागौरव पुरस्कार, चित्रभूषण पुरस्कार व बालगंधर्व पुरस्कार (निधन: ४ जुलै १९९९)

१८९८: हेस्टिंग्ज बांदा - मलावी देशाचे पहिले अध्यक्ष (निधन: २५ नोव्हेंबर १९९७)

### निधन

२०२२: अँड्र्यू सायमंड्स - ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू (जन्म: ९ जून १९७५)

२०२२ : उर्वशी वैद - भारतीय-अमेरिकन LGBT कार्यकर्त्या, वकील आणि लेखिका (जन्म: ८ ऑक्टोबर १९५८)

२०२२: जगदंबा प्रसाद निगम भारतीय राजकारणी, मध्यप्रदेशचे आमदार (जन्म: २० फेब्रुवारी १९२८)

२०१३ : असगर अली इंजिनिअर भारतीय लेखक (जन्म: १० मार्च १९३९)

२०१२: तरुणी सचदेव - लोकप्रसिध्द पेय रसनाच्या जाहिरातीतील बालकलाकार (जन्म: १४ मे १९९८)

## राशि भविष्य

**मेष**: तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. शंकास्पद आर्थिक व्यवहारांमध्ये गुंतले जाणार नाही याची काळजी घ्या. तुम्ही पार्टी देण्याचा विचार करत असाल तर तुमच्या सर्वात चांगल्या मित्रांना बोलवा. तुमचे कौतुक करणारे अनेकजण असतील.

**वृषभ**: पटकन रागावणे तुम्हाला एखाद्या अडचणीत टाकू शकते. आज केलेली गुंतवणूक तुमच्या समृद्धी आणि आर्थिक सुरक्षिततेला पूरक ठरेल. घरातील कामं पुरी करण्यासाठी मुलं तुम्हाला मदत करतील. आशा आकांक्षा सोडू नका, अपयश हे नैसर्गिक आहे, किंबहुना आयुष्याचे तेच खरे सौंदर्य आहे.

**मिथुन**: मोतीबिंदू असणा-या रुग्णांनी प्रदुषित वातावरणात जाणे टाळावे. धुरामुळे आपल्या डोळ्यांना आणखी त्रास होऊ शकतो. प्रखर सूर्यप्रकाशात जाणे शक्यतो टाळावे. रात्रीच्या वेळी तुम्हाला आज धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे कारण, तुमच्या द्वारे दिले गेलेले धन आज तुम्हाला परत मिळू शकते.

**कर्क**: इतरांच्या गरजा तुमच्या इच्छेच्या आड येतील परंतु त्यामध्ये तुमची काळजी हाच भाग असेल. - तुमच्या भावनांना रोखू नका आणि आराम वाटण्यासाठी तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टी करा. पैश्याची किंमत तुम्ही चांगल्या प्रकारे जाणतात म्हणून आजच्या दिवशी तुमच्या द्वारे वाचवलेले धन तुमच्या खूप कामी येऊ शकते.

**सिंह**: आपले मत मांडण्यास कचरु नका. तुमचा आत्मविश्वास ढळू देऊ नका, अन्यथा त्यामुळे आपल्या प्रगतीमध्ये अनेक अडचणी निर्माण होतील. स्वत:ला व्यक्त होऊ द्या आणि हसतमुखाने अडचणींचा सामना करा. अधिकचा पैसा स्थावर जंगम मालमत्तेत गुंतवा. एखादी जुनी ओळख तुमच्यासाठी अडचण निर्माण करु शकते.

**कन्या**: तुमचे हास्य हे नैराश्य घालविण्यासाठीचा उत्तम उपाय ठरल. तुमचा निर्धार आणि मेहनत याकडे सर्वांचे लक्ष जाईल आणि काही आर्थिक पारितोषिकही आज तुम्हाला मिळेल. आपल्या घरातील वातावरण बदलण्यापूर्वी तुम्हाला सर्वांचा होकार असल्याची खात्री करा.

**तूळ**: तुमच्यात आज उत्तम स्पुर्ती पहिली जाईल. तुमचे स्वास्थ्य आज पूर्णतः तुमची साथ देतील. ज्या लोकांनी कुणी अनोळखी व्यक्तीच्या सल्ल्यावर काही धन गुंतवणूक केली होती आज त्यांना त्या गुंतवणुकीचा फायदा होण्याची पूर्ण शक्यता आहे.

**वृश्चिक**: आजचा दिवस लाभदायक असून, तुम्हाला तुमच्या दीर्घ आजारापासून सुटका मिळण्याची शक्यता आहे. कुणी जवळच्या नातेवाइकाच्या मदतीने आज तुम्ही आपल्या व्यवसायात उत्तम प्रगती करू शकतात ज्यामुळे तुम्हाला आर्थिक लाभ ही होईल.

**धनु**: स्वत:बद्दल छान वाटावे अशा गोष्टी घडण्याचा एकदम अद्भूत दिवस. जे लोक पैश्याला आतापर्यंत विनाकारण खर्च करत होते आज त्यांनी आपल्यावर काबू ठेवला पाहिजे आणि धनाची बचत केली पाहिजे. नातेवाईकांना भेट देण्याचा अनुभव तुम्हाला वाटला त्यापेक्षा बरा असेल.

**मकर**: भूतकाळात घेतलेल्या चुकीच्या निर्णयांमुळे आज नैराश्य आणि मानसिक गोंधळ उडेल - पुढे काय करायचे हे ठरविणे अवघड होऊन बसेल - इतरांची मदत घ्या. अचानक पैसा आल्याने तुमची प्रलंबित बिले आणि ताबडतोब करावयाचे खर्च भागतील.

**कुंभ**: भरपूर प्रवासामुळे तुम्ही उन्मादी बनाल. तसे तर आपला पैसा दुसऱ्यांना देणे कुणाला आवडत नाही परंतु, आज तुम्ही कुणी गरजूला पैसा देऊन आनंदाचा अनुभव कराल. आपल्या जीवनसाथी बरोबर चित्रपट पाहणे अथवा रात्रीचे जेवण करणे तुम्हाल शांतता, आराम मिळवून देईल आणि तुमचा मूड एकदम बहारदार राहील.

**मीन**: तुमच्या आशेचा पतंग एखाद्या उंची अत्तरासारखा आणि डुलणाऱ्या फुलासारखा दरवळेल. तुमची कलात्मक बुद्धिमत्ता नीट वापरली तर खूप फायदेशीर ठरेल. मुलांच्या यशस्वी होण्यामुळे तुम्हाला अभिमान वाटेल. आजच्या दिवशी प्रेमात पडल्यामुळे एखाद्या पवित्र घटनेचा अनादर ठरु शकतो, त्यामुळे काळजी घ्या.

## पत्नीला शिवीगाळ केल्याने मित्राची हत्या; गुंडा विरोधी पथकाने आरोपीला ठोकल्या बेड्या



● पिंपरी- चिंचवड - पत्नीला अश्लील शिवीगाळ केल्याने मित्राची हत्या केल्याची घटना घडली आहे. पिंपरी- चिंचवडच्या गुंडा विरोधी पथकाने आरोपीला अटक केली आहे. केतन निवृत्ती कोंढाळकर वय- २८ असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. संदीप उर्फ दशरथ देशमाने वय- २५ असे हत्या केलेल्या आरोपीचे नाव आहे. संदीपने केतनच्या डोक्यात सिमेंटच्या गट्टूने घाव घालून हत्या केली.

शहरातील मोशी भागात अनोळखी व्यक्तीची हत्या झाल्याचं समोर आलं होतं. एमआयडीसी भोसरी पोलीस आणि गुंडा विरोधी पथक आरोपींचा शोध घेत होत. याच दरम्यान हत्या झालेल्या तरुणाचे नाव हे केतन निवृत्ती कोंढाळकर असल्याचं निष्पन्न झाले. दिवसभर तो कोणाशी बोलला याच तांत्रिक विश्लेषण करून गुंडा विरोधी पथक आरोपीपर्यंत पोहोचले. आरोपी संदीप उर्फ दशरथ देशमानेला थेरगाव येथील मैत्रिणीच्या घरातून अटक केली. आरोपी संदीपकडे पोलिसांनी चौकशी केली. या चौकशीत हत्या झालेल्या केतन कोंढाळकर याने संदीपच्या पत्नीला अश्लील शिवीगाळ केली होती. याच रागातून संदीपने केतनची डोक्यात सिमेंटचा गट्टू घालून जीवे ठार मारले. या सर्व घटनेप्रकरणी आरोपी संदीपच्या विरोधात एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात २४६/२०२४ भा.द.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वाहनाला आकर्षक क्रमांक हवाय?

### आरटीओतील लिलाव प्रक्रियेविषयी जाणून घ्या

● पुणे : प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) लवकरच दुचाकी वाहनांसाठी नवीन नोंदणी क्रमांक मालिका सुरू करण्यात येत आहे. या मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक तीनपट शुल्क भरून खासगी चारचाकी वाहनांसाठी राखून ठेवण्यासाठी, तसेच उर्वरित क्रमांकाबाबत दुचाकींसाठी आगाऊ अर्ज स्वीकारण्याची, लिलाव कार्यपद्धतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.




नव्याने सुरू होणाऱ्या दुचाकी मालिकेतील आकर्षक, तसेच पसंतीचे क्रमांक चारचाकींसाठी हवे असलेल्या वाहन मालकांनी तीनपट शुल्कासह १५ मे रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत विहित नमुन्यात अर्ज करावा. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्याची यादी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. लिलावाचे धनाकर्ष १६ मे रोजी दुपारी अडीच वाजेपर्यंत स्वीकारले जातील. त्याच दिवशी दुपारी चार वाजता सहकार सभागृहामध्ये लिलाव करण्यात येईल, अशी माहिती आरटीओने दिली.

दुचाकी वाहन मालकांनी आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरून हवे असल्यास १६ मे रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत अर्ज करावा. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज असल्यास त्याची यादी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. लिलावाचे डीडी १७ मे रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारले जातील. त्याच दिवशी दुपारी चार वाजता सहकार सभागृहामध्ये लिलाव करण्यात येईल, असे आरटीओने स्पष्ट केले आहे.

अर्ज कार्यालयाच्या खासगी वाहन नोंदणी विभागात धनाकर्ष, पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह आधार कार्डला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकासह जमा करावा. हा डीडी 'आर.टी.ओ.,पुणे' यांच्या नावे राष्ट्रीयीकृत बँकेचा पुणे येथील असावा, असे आरटीओने नमूद केले आहे.

### पुण्यातील वाहनधारकांनीच अर्ज करावेत

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर न केल्यास राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल आणि शुल्क सरकारजमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेले शुल्क परत करता येणार नाही. प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणेच्या कार्यक्षेत्रातील वाहनधारकांनीच अर्ज सादर करावेत, कार्यक्षेत्राबाहेरील अर्ज, चुकीच्या रकमेचा डीडी जोडलेले तसेच अचूक मोबाईल क्रमांक न लिहिलेले अर्ज बाद ठरविण्यात येणार असल्याचे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी कळविले आहे.

## तेजस गर्गे अद्यापही फरार, लाच प्रकरणातील संशयित



● नाशिक : उद्योग सुरू करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरिता दीड लाख रुपयांची लाच स्वीकारल्याच्या प्रकरणातील मुख्य संशयित पुरातत्व व वस्तू संग्रहालय संचालनालयाचे संचालक तेजस गर्गे अद्यापही फरार आहे. दुसऱ्या संशयित नाशिकच्या पुरातत्व विभागाच्या सहायक संचालक (अतिरिक्त कार्यभार) आरती आळे यांना बाळ असल्याने त्यांनाही अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

उद्योग सुरू करण्यासाठी तक्रारदाराला पुरातत्व विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र पाहिजे होते. यासाठी त्याने येथील पुरातत्व विभागाकडे अर्ज केला होता. हे प्रमाणपत्र देण्यासाठी सहायक संचालक आरती आळे यांनी दीड लाख रुपयांची लाच मागितली. आळे या प्रसुतीरजेवर असल्याने निवासस्थानी त्यांना लाच स्वीकारतांना रंगेहात पकडण्यात आले. आळे यांचे घर भाडेतत्वावर असून त्यांचे मूळ मालक तेजस गर्गे यांचे वडील मदन गर्गे आहेत. या प्रकरणात पुरातत्व व वस्तू संग्रहालय संचालनालयाचे संचालक तेजस गर्गे यांचाही सहभाग उघड झाला. याप्रकरणी आळे आणि गर्गे यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विकास रुळावर कधी येणार?

● छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्रातल्या २०२ साखर कारखान्यांना ऊसतोडणीसाठी सहा लाखांहून अधिक मजूर पुरवणारा जिल्हा ही बीडची ओळख तशी नकारात्मकच. पण एखाद्या जिल्ह्यात एवढे मनुष्यबळ असणे आणि कष्ट करण्याची तयारी असणाऱ्यांची संख्या असणे याचे सकारात्मक परिणामही जिल्ह्याच्या विकासात दिसून येतात.

गेल्या दशकभरात वाढीचा वेग ८.१९ टक्के एवढा होता. राज्याच्या एकूण उत्पन्नात जिल्ह्याचा अर्थव्यवस्थेचा वाटा १.३ टक्के. रोजगाराला चालना देणाऱ्या काही बाबी नव्याने सुरू झाल्या आहेत. रेशीम शेती, खवा उत्पादन, कुक्कुटपालन यांसह कापूस, सोयाबीन, सीताफळ याच्या वाढीसाठी विशेष नियोजन आखले जात आहे. बीड, नगर हे एकमेकांना जोडलेले जिल्हे रेल्वेपटरीवर येतील, असे नियोजन गेली अनेक वर्षे सुरू आहे. पण त्याला फारशी गती मिळाली नाही. धुळे-सोलापूर हा राष्ट्रीय महामार्ग वगळला तर अन्यत्र वाहतूक आणि दळणवळणाची साधने अपुरीच.



### अपारंपरिक ऊर्जेस वाव

परळी येथे एक औष्णिक विद्युत केंद्र आहे. त्याचबरोबरीला अपारंपरिक ऊर्जेतून वीजनिर्मितीलाही मोठा वाव आहे. तो ३५ टक्क्यांपर्यंत वाढवता येऊ शकतो. सौर ऊर्जेतून १६०० तर पवन ऊर्जेतून ७०० मेगावॅट वीजनिर्मिती करता येऊ शकते, एवढी क्षमता जिल्ह्याच्या भौगोलिक रचनेत आहे. मात्र, या अनुषंगाने विशेष धोरणात्मक निर्णय व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. निर्यातक्षम बाजारपेठ शोधून त्यातही प्रोत्साहन देण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत. कृषी व संलग्न उद्योगांसाठी मोठ्या तरतुदीची मागणी, पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी तंत्रज्ञानात संशोधन करण्यासाठी गुंतवणूक करावी लागणार आहे.

त्यामुळे जिल्ह्यातील वार्षिक उलाढाल ४१ हजार ८०१ कोटींच्या घरात जाणारी. २०२८ पर्यंत वाढीचा वेग १७ टक्क्यांनी पुढे न्यायचा असून, दरवर्षी किमान १.४ टक्के वाटा राज्याच्या उत्पन्नात वाढावा, असे नियोजन आखले जात आहे. पुढच्या पाच वर्षांत १०७ लाख कोटी रुपयांपर्यंतचा वाढीचा वेग असावा, असे जिल्हा प्रशासनाने ठरविले आहे. वाढीचा सगळा भार कृषी आणि कृषीसंलग्न सेवांवर अवलंबून आहे.


गेल्या वर्षभरात उद्योगवाढीत घसरण होती. काही भागांमध्ये 'टेक्सटाईल क्लस्टर' तयार केले जावे तसेच जिनिंग व प्रेसिंग या उद्योगात जिल्ह्यातील व्यवहार वाढावेत, असेही प्रयत्न केले जात आहेत. मराठवाड्यात चांगली चालणारी सुतगिरणी बीड जिल्ह्यातच सुरू आहे. मात्र, कापूस व्यवहाराचे एवढे खासगीकरण झाले आहे की, उत्तम दर्जाचा कापूस विकत घेण्यासाठी सुतगिरणी चालकांना बरीच पळापळ करावी लागते. बीड जिल्ह्यात धार्मिक पर्यटनाला वाव आहे.

# पंचगंगा नदी प्रदूषणाची महापालिका, प्रांत विभागाकडून पाहणी सुरू

### जयंती नाल्याचे पाणी थेट नदीत मिळत असल्याचे उघडकीस

● कोल्हापूर : पंचगंगा नदीच्या प्रदूषणाची तीव्रता वाढत चालली असल्याचे मंगळवारी केलेल्या संयुक्त पाहणी वेळी दिसून आले. कोल्हापुरातील जयंती नाल्याचे तसेच कसबा बावडा येथील छत्रपती कॉलनीतील नाल्याचे काळे फेसाळलेले मलमिश्रित पाणी पंचगंगा नदीत मिसळत असल्याचा प्रकार दिसून आला. यावेळी कोल्हापूर प्रदूषण नियंत्रण मंडळ, महापालिका, करवीर प्रांत कार्यालयाचे प्रतिनिधी आणि उच्च न्यायालयाचे याचिकाकर्ते दिलीप देसाई उपस्थित होते.

कोल्हापुरातील पंचगंगा नदीच्या प्रदूषणात भर पडत चालली आहे. कोल्हापूर, शिरोळ येथे मोठ्या प्रमाणात जलपर्णी पसरली आहे. तर इचलकरंजी येथे काळेकुट्ट पाणी नदीतून वाहत आहे. या विरोधात



प्रजासत्ताक सामाजिक सेवा संघटनेचे अध्यक्ष दिलीप देसाई यांनी पर्यावरण नियंत्रण मंडळाकडे तक्रार केली होती. त्यांनी संयुक्त पाहणी करण्याची मागणी केली होती. मात्र त्याकडे कोल्हापूर, इचलकरंजी महापालिका तसेच करवीर, इचलकरंजी उपविभागीय कार्यालय यांनी दुर्लक्ष केले होते. त्यावर देसाई यांनी २०१० प्रमाणे पुन्हा एकदा उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा इशारा दिला. त्यानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी जे. एस. साळुंखे यांनी कोल्हापूर, इचलकरंजी महापालिका आयुक्त तसेच करवीर, इचलकरंजी उपविभागीय अधिकारी यांना मंगळवारी न चुकता संयुक्त पाहणी करण्यासाठी हजर राहण्याचे पत्र पाठवले. तसेच उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी असेही सूचित केले होते. त्यावर कोल्हापूर, इचलकरंजी महापालिका तसेच दोन्ही उपविभागीय कार्यालयांना जाग आली. त्यानुसार आज कोल्हापूर महापालिकेचे उपआयुक्त अंकुश पाटील, करवीर तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार भालचंद्र यादव, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी तसेच उच्च न्यायालयातील याचिकाकर्ते दिलीप देसाई यांनी आज संयुक्त पाहणी केली.

# Salman Khan house firing: Lawrence Bishnoi gang member who sent recce video to Anmol arrested

● Mumbai | The Mumbai police on Tuesday said they have arrested one more member of the Lawrence Bishnoi gang in connection with the firing outside Bollywood actor Salman Khan's house last month.

Harpal Singh, alias Harry, 33, was arrested from Haryana, produced before a court in Mumbai, and remanded in police custody until May 22. This was the sixth arrest in connection with the case.

An officer said, "Harpal Singh is an important member of the Lawrence Bishnoi gang in India. He was used to collecting extortion amounts from victims.




He also has a firing case registered against him."

Two motorcycle-borne men opened fire outside Salman Khan's residence at the Galaxy Apartment in Mumbai's Bandra area on April 14 and fled from the spot.

The police said a video of Salman Khan's house during a recce, shot by the fifth accused, Mohammad Rafiq Chaudhary, was sent to Harpal. They said he forwarded it using the Telegram app to Anmol Bishnoi, Lawrence's younger brother, since Chaudhary did not have the app.

Anmol, who is the younger brother of incarcerated gangster Lawrence Bishnoi, is believed to be holed up in the United States or Canada. Soon after the firing outside Khan's residence, Anmol put up a social media post claiming responsibility for the firing.

He claimed that since the actor had shot a blackbuck – considered holy by the Bishnoi community – in Rajasthan during a film shooting in 1998, the gang was targeting him.

One of the arrested accused, Anuj Thapan, died by suicide in jail on May 1.

# One dead in fire at Income Tax CR Building at ITO

● New Delhi : One person died after a fire broke out inside the Income Tax CR Building in ITO area on Tuesday, the police said. Seven people five men and two women were rescued safely.

The fire broke out in the building located opposite the old Police Headquarters, which is still occupied by the force for some of its units. "We received a call at 3.07 pm, regarding a fire in the Income Tax



CR building. We have rushed a total of 21 fire tenders. We have also informed the local police about the matter for further investigation and to maintain law and order," officials of the DFS said.

According to some videos which turned up on social media, the occupants of the building took shelter on a window ledge while escaping the fire. The firefighters helped them get down through ladders.

# Mumbai billboard collapse leaves 14 dead: All you need to know

● Mumbai | As the first spell of pre-monsoon showers lashed Mumbai on Monday afternoon, a 100-foot-tall illegal billboard collapsed in the eastern suburb of Ghatkopar due to thunderstorms and gusty winds. The incident claimed the lives of at least 14 people and injured 74 others. Among the injured, 44 are still hospitalized, with one person in critical condition. 31 individuals have been discharged so far according to local authorities.

Here's all you need to know about the accident

The billboard, which fell onto some houses and a petrol station alongside a busy road, caused significant disruptions, trapping scores of people and bringing parts of the city to a standstill.

The Pant Nagar police, under whose jurisdiction the Mumbai hoarding collapse incident took place, on Monday night registered a First Information Report (FIR) against Bhavesh Prabhudas Bhinde, 51, the director of Ego Media Pvt Ltd which had the contract for the hoarding on a 10-year lease.



According to documents, Bhinde was booked in a rape case by the Mumbai police earlier this year. Bhinde, who contested as an Independent candidate in the 2009 Maharashtra Assembly elections, had also declared 21 instances where he was fined under the Mumbai Municipal Corporation (MMC) Act for putting up banners without permission and two offences related to the Negotiable Instruments (NI) Act that usually pertain to cheque bouncing.

The GRP said that it had received a letter from the Brihanmumbai Municipal Corporation (BMC) last week recommending action against the advertiser on the removal of the hoarding based on the complaints in connection with the alleged drying up of trees alongside the road. "We had started the proceedings but before the action could be taken, the (tragic) incident occurred," the GRP said in a statement released by Assistant Commissioner of Police (Admin) Shahaji Nikam.

After the hoarding collapsed, rescue operations extended into the early hours of Tuesday, and operations at Mumbai's airport, one of the busiest in the country, were also disrupted. DRF Inspector Gaurav Chauhan said "There are two teams including 53 personnel. We have been continuing this operation for the last 18 hours. We have so far recovered 14 bodies and 74 injured persons. They have been sent to hospitals. The hoarding fell on the petrol pump and hence we are not using the cutting equipment. It can cause a spark and create other scenario. We used a hydraulic crane but it was not successful. We are using manual techniques. The operation is expected to be over by this evening."

Mumbai Police Commissioner Vivek Phansalkar assured the public that strict legal actions are forthcoming. "Heartfelt condolences to families who lost their loved ones in the unfortunate mishap at Ghatkopar," Phansalkar said on his official X handle.

लोकरक्षणाय

# नांदेडमध्ये आयकर विभागाची मोठी कारवाई !

## 8 किलो दागिने, 170 कोटींची बेहिशोभी संपत्ती जप्त

● नांदेड प्रतिनिधी :




नांदेडमध्ये असलेल्या संजय भंडारी फायनान्सकडे आयकर विभागाने छापा टाकत मोठी कारवाई केली. आयकर विभागाने शुक्रवारी केलेल्या या छापेमारीत 170 कोटीची बेहिशोभी मालामत्ता जप्त करण्यात आली आहे.

त्यात आता 14 कोटी रुपये रोख, तर 8 किलोचे दागिने सुद्धा जप्त करण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे. 14 कोटीची रोकड मोजण्यासाठी आयकर विभागाला 14 तास लागल्याचे बोलले जात आहे. तर या कारवाईत काही महत्वपूर्ण दस्तावेज सुद्धा आयकर विभागाच्या हाती लागले आहे.

आयकर विभागाची हि कारवाई गेल्या 72 तासापासून सुरु असून अद्याप पोलीस आणि आयकर विभाग पुढील तपास करत आहेत. या घटनेने सध्या नांदेड शहरात एकच खळबळ उडाली आहे. अशातच या तपासाचे धागेदोरे आणखी उलगडत असताना नवनवीन माहिती हाती लागत आहे. मात्र, अल्पावधीतच कोट्यवधींची माया जमावणारे हे फायनान्सर भंडारी आहेत तरी कोण? हा प्रश्न आता साऱ्यांना पडला आहे.

नांदेड मधील शिवाजीनगर भागात भंडारी यांचा निवस्थानी आयकर विभागाने छापा मारला. त्यानंतर भंडारी यांच्या संस्था आदिनाथ अर्बन मल्टिस्टेट या ठिकाणी चौकशी करत त्यांचा घरासह सर्व आस्थापनांची आयकर विभागे चौकशी केली. त्यानंतर निवस्थानी जाऊन घराची तपासणी केल्यानंतर 14 कोटी रूपय मिळाले. तर 8 किलो सोन देखील जप्त करण्यात आले. भंडारी हे 7 भाऊ आहेत.महावीर भंडारी संजय भंडारी, पदम भंडारी, विनय भंडारी, संतोष भंडारी, आशिष भंडारी, विजय भंडारी हे ते 7 भाऊ आहेत. गेल्या 15 वर्षापासून संजय भंडारी हे बीसी फायनान्सच्या व्यवसायात उतरले.

फायनान्स नंतर त्यांनी गोल्ड स्कीम देण्याचे काम सुरू केले. त्यानंतर भंडारी यांनी बांधकाम व्यवसाय आणि बिल्डरशीप, वाहन कर्ज, डेली फायनान्सच्या माध्यमातून लाखोंचा वाटप केला. 1 लाख रुपयांसाठी ते 11 हजार रुपय कपात करत होते. तर 100 दिवसात 1000 रुपय हे डेली जमा करावं लागतं होते. रोज पैसे चुकल्यास त्यांना दंड देखील आकरला जात होता. त्यानंतर गोल्ड स्कीममध्ये 1 किलो गोल्ड देण्याची स्कीम देखील त्यांनी चालवली होती. त्यासाठी त्यांनी गुंतवणुक करण्यासाठी एक टीमही तयार केली होती. भंडारी यांच्याकडे मोठे व्यापारी, डॉक्टर, उद्योजक आणि राजकिय नेतेमंडळी सुद्धा येत असून भंडारी यांचे अनेकांसोबत मैत्रीपूर्ण संबंध होते. त्यामुळे भंडारी यांच्याकडे सतत अनेकांचे येण-जाणे सुद्धा होत होतं. नांदेड शहरात जम बसल्यानंतर भंडारी यांनी मराठवाड्यात त्यांचे फायनान्सचे एक नेटवर्क तयार केले होते. त्यावेळी त्यांच्याकडे कोट्यवधींच्या बीसी साठी 3 ते 5 टक्याचे कमिशन घेत होते. याच व्यवसायात त्यांनी कोट्यवधींची पैसा कमावला आणि तोच पैसा त्यांनी बाजारात पुन्हा फिरवला. पुढे प्लॉट व्यवसायात जागा नावाने करून घेणे आणि त्यांना फायनान्स करणे हे सुद्धा भंडारी यांनी केले. तसेच इतर ठिकाणी पैसे पाठवण्यासाठी हवालाचे काम सुद्धा भंडारी करत होते. आयकर विभागाची धाड पडण्याची आधी संतोष भंडारी यांनी कोट्यवधींची प्लॉट त्यांनी 25 हजार चौरसफुटाच्या दराने घेतल्याची चर्चा आहे.

## होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करा, अन्यथा गुन्हा दाखल; घाटकोपर दुर्घटनेनंतर सातारा पालिका सतर्क

● सातारा प्रतिनिधी :



घाटकोपर येथील होर्डिंग दुर्घटनेनंतर सातारा पालिका सतर्क झाली असून, पालिकेने शहरातील सर्व होर्डिंग व फ्लेक्सधारकांना मंगळवारी नोटीस जारी केली. होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करून त्याचा अहवाल तीन दिवसांत पालिकेत सादर करावा, अन्यथा होर्डिंग जप्त करून संबंधितांवर गुन्हे दाखल केले जातील, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. मुंबईतील घाटकोपर येथे सोमवारी (दि. १३) एका पेट्रोल पंपाजवळ महाकाय होर्डिंग कोसळल्याने १४ जणांना आपला जीव गमवावा लागला तर, ७५ हून अधिक नागरिक जखमी झाले.

या घटनेनंतर राज्यातील होर्डिंगचा प्रश्न चर्चेचा विषय ठरला आहे. सातारा पालिका प्रशासनानेदेखील खबरदारीचा उपाय म्हणून पालिकेच्या जागेवर व खासगी मिळकतींवर लावणाऱ्या होर्डिंग व फ्लेक्सधारकांना मंगळवारी नोटीस बजावली. होर्डिंगधारकांनी ज्या इमारतीवर होर्डिंग उभारले आहे त्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे, मिळकतधारकांशी केलेला करारनामा, मिळकतदार व सातारा पालिकेने होर्डिंगसाठी दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र आदी दस्तऐवज तीन दिवसांत पालिकेत सादर करावा, असे नोटिसीत नमूद केले आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर विद्रुपीकरण कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून होर्डिंग जप्त करण्याची कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासक तथा मुख्याधिकारी अभिजित बापट यांनी दिला आहे.

# बुरशी लागलेली औषधे विकणाऱ्या कंपन्यांना दणका, ग्राहकाला द्यावी लागणार नुकसान भरपाई

● पुणे प्रतिनिधी :



बुरशी आलेल्या आणि रंग गेलेल्या औषधी गोळ्या ग्राहकाला विकणे औषधे उत्पादक कंपनी आणि त्याची ऑनलाइन विक्री करणाऱ्या कंपन्यांना महागात पडले आहे. या कंपन्यांनी ग्राहकाला एक लाख रुपये नुकसान भरपाई आणि पाच हजार रुपयांचा तक्रार खर्च द्यावा, असे आदेश ग्राहक आयोगाने दिले आहेत. औषधासारख्या नागरिकांच्या जीवनाशी निगडीत उत्पादनाबाबत कंपनीने आवश्यक दक्षता घेतली नाही आणि औषधांचा अपेक्षित दर्जा सांभाळला नाही, तर औषधांसारखे उत्पादन ऑनलाइन विक्रीस ठेवताना वितरक कंपन्यांनी आवश्यक दक्षता घेणे गरजेचे आहे, असे ताशेरेही आयोगाने निकालपत्रात ओढले आहेत. पुण्याच्या अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष जयंत देशमुख, सदस्या प्रणाली सावंत व शुभांगी दुनाखे यांनी हा निकाल दिला.

या प्रकरणात खेसे पार्क येथील रहिवासी पंकज जगसिया यांनी 'मॅक्लाउड्स फार्मास्युटिकल्स' ही औषध निर्माती कंपनी व तिचे संचालक, दादा कंपनी आणि नेटमेड्स डॉट कॉम आणि प्लॅनेट फार्मा या औषध वितरक कंपन्यांच्या विरोधात आयोगात तक्रार दाखल केली होती. तक्रारदारांनी 'नेटमेड्स'च्या संकेतस्थळावरून त्यांच्या ७२ वर्षांच्या आईसाठी औषधे मागवली होती. त्याचे सीलबंद पाकीट २२ सप्टेंबर २०१९ ला तक्रारदारांना मिळाले. त्यातील औषधांच्या दहापैकी दोन गोळ्यांचा रंग गेला होता, तसेच त्यांना बुरशी आली होती. त्यामुळे तक्रारदारांनी अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार केली होती. हे औषध आईने घेतले असते, तर त्याचे भयंकर परिणाम होऊ शकले असते, असा दावा करत तक्रारदारांनी कंपन्यांविरोधात आयोगाकडे धाव घेत सदोष औषधे पुरविल्याची तक्रार केली. आयोगाने नोटीस बजावल्यावर औषध निर्मात्या कंपन्यांकडून कोणी हजर झाले नाही, तर औषध विक्रेत्या कंपन्यांनी आपला लेखी जबाब मुदतीत सादर केला नाही. त्यामुळे आयोगाने ग्राहकाच्या बाजूने एकतर्फी निकाल दिला.

तक्रारदार ग्राहकाला ऑनलाइन आलेल्या औषधी गोळ्यांची तपासणी अन्न आणि औषध प्रशासनाने केली. त्यात या औषधांचा रंग गेला होता, तसेच त्यांना बुरशी लागल्याचे आढळून आले. त्यामुळे कंपन्यांनी ग्राहकाला सदोष औषधे पुरविल्याचे सिद्ध झाले.

# रवींद्र धंगेकरांना ठिय्या आंदोलन भोवलं; धंगेकरांसह 35 ते 40 कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल

● पुणे प्रतिनिधी :



पुण्यामध्ये महाविकास आघाडीचे लोकसभेचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बेकायदेशीर जमाव गोळा केल्या प्रकरणी धंगेकरांच्या विरोधात गुन्हा दाखल झालेला आहे. भाजपावरती पैसे वाटप केल्याचा आरोप करत धंगेकर यांनी मतदानाच्या आदल्या दिशवी ठिया आंदोलन केलेलं होतं. ते आंदोलन करणं धंगेकरांना चांगलंच महागात पडलं आहे. सहकारनगर पोलीस ठाण्यात धंगेकरांसह 35 ते 40 कार्यकर्त्यांविरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मतदानाच्या आदल्या दिवशी पैसे वाटप करणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांची नावे सांगूनही त्यांच्यावर कसलीही कारवाई पोलीस करत नसल्याने सहकारनगर पोलीस ठाण्यातच काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी रविवारी ठिय्या आंदोलन केलं होतं. यावेळी महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. जोपर्यंत पोलीस पैसे वाटप करणाऱ्यांवर कारवाई करत नाहीत तोपर्यंत पोलीस ठाण्यातून उठणार नाही, असा आक्रमक पवित्रा धंगेकर यांनी घेतला होता.घराघरात पैसे वाटले जात आहेत. विविध मार्गानि जनतेचा हडप केलेला पैसा या निवडणुकीत वापरून जिंकू असे भाजपला वाटत आहे. गेल्या दोन दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पैसे वाटले जात आहेत. आजी-माजी नगरसेवक यांच्यापासून ते भाजपचे वरिष्ठ नेते यात गुंतले आहेत. याची माहिती आम्ही पोलिसांना दिली. पैसे वाटणाऱ्यांची नावं सांगितली. तरीही त्यांच्यावर कारवाई नाही. त्यामुळे आम्ही गप्प राहणार नाही. आम्हाला लोकशाही वाचवायची आहे. आम्हाला संविधान वाचवायचे आहे. निवडणुका पैसे वाटून नव्हे तर लोकशाही पद्धतीने व्हाव्यात, हीच आमची भूमिका आहे, असं आंदोलनावेळी धंगेकर म्हणाले होते.

### भाजपकडूनही ठिय्या...

धंगेकरांचं आंदोलन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजेच मतदानाच्या दिवशी भाजपकडूनही धंगेकरांच्या विरोधात ठिय्या आंदोलन करण्यात आलं होतं. मतदानाच्या दिवशी कोणत्याही बुथवर उमेदवाराचा फोटो किंवा पक्षाचं चिन्ह होतं. असं करुन कॉंग्रेस मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत भाजपकडून करण्यात आला होता.

## काँग्रेसच्या आरोपावर अण्णा हजारे यांचे वक्तव्य, असे झाले तर देशात आग लागणार


● पारनेर प्रतिनिधी :



राज्यात सोमवारी लोकसभेच्या चौथ्या टप्प्यासाठी मतदान झाले आहे. अहमदनगर लोकसभा मतदारसंघाचाही चौथ्या टप्प्यात समावेश करण्यात आला आहे. सोमवारी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनीही मतदानाचा हक्क बजावला. अण्णा हजारे यांनी वयाच्या ८८ व्या वर्षी राळेगणसिद्धीमध्ये मतदानाचा हक्क बजावला. यानंतर लोकसभा निवडणुकीसंदर्भात काँग्रेस आणि विरोधकांकडून होत असलेल्या आरोपावर अण्णा हजारे यांनी उत्तर दिले. प्रसारमाध्यमांशी बोलताना अण्णा हजारे यांनी अनेक मुद्द्यांवर प्रतिक्रिया दिली. राज्यघटना बदलण्याचे षडयंत्र भाजपवर असल्याचा आरोप काँग्रेस सातत्याने करत आहे. यावर अण्णा हजारे यांनी पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. कोणत्याही सरकारने किंवा पक्षाने संविधान बदलण्याचा प्रयत्न केला तर देश पेटेल. आपले संविधान परिपूर्ण आहे.

# मी कुठलंही वचन दिलं नव्हतं, उद्धव ठाकरे खोटं बोलतायेत; अमित शाहांनी पुन्हा फटकारलं

● मुंबई प्रतिनिधी:



मी कुठलंही वचन दिलं नव्हते, उद्धव ठाकरे खोटं बोलतायेत, माझी सर्व भाषणे तपासा, त्यात उद्धव ठाकरेंसमक्ष आम्ही देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वात निवडणूक लढतोय हे जाहीर केले होते. पूर्ण निवडणूक प्रचारात उद्धव ठाकरेंनी कुठेही त्यांच्या पक्षाचा मुख्यमंत्री बनेल असं विधान केले नव्हते असा दावा भाजपा नेते अमित शाह यांनी केला.

अमित शाह म्हणाले की, उद्धव ठाकरे आज ज्यांच्यासोबत बसलेत ते मुस्लीम पर्सनल लॉ आणू इच्छितात. वर्षोनुवर्षे ज्यांनी राम मंदिराचा विरोध केला. तिहेरी तलाक पुन्हा परत आणायचं आहे. उद्धव ठाकरे कुणासोबत बसलेत हे महाराष्ट्रातील जनता जाणते. शरद पवारांनी महाराष्ट्राचं राजकारण कायम अस्थिर करण्याचा प्रयत्न केला. उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्या पुत्रमोहामुळे प्रादेशिक पक्षात फूट पडली. महाराष्ट्राचं राजकारण वेगळ्या दिशेने जातंय. काँग्रेस-राष्ट्रवादीचं सरकार असताना १५ वर्ष महाराष्ट्राचं नुकसान झालं. औद्योगिक गुंतवणुकीत महाराष्ट्र मागे पडला होता असं त्यांनी सांगितले.

तसेच महाराष्ट्रातील जनतेनं भाजपाला संधी दिली. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री बनले, या सरकारने महाराष्ट्राला पुढे आणण्याचं काम केले. परंतु उद्धव ठाकरेंनी सर्व विचारधारा सोडून निवडणुकीनंतर युतीला दगाफटका करत मुख्यमंत्री बनण्यासाठी, हिंदुत्व सोडून काँग्रेस-राष्ट्रवादीच्या पायाशी गेले. बाळासाहेबांच्या विचारावर पक्ष ओळखला जातो, हे विचार कोण पुढे घेऊन जाते हे लोकांना माहिती आहे. भाषणाच्या सुरुवातीला हिंदू शब्दही आता बोलला जात नाही. औरंगाबाद नव्हे तर संभाजीनगर हे बाळासाहेबांनी सांगितले होते. त्यालाही काँग्रेसचा विरोध होता असं अमित शाह यांनी म्हटलं.

## देश विकासाची नवी शिखरे पादाक्रांत करतोय आणि आमच्या आयुष्यातील महत्त्वाचा काळ वाया जातोय

● ठाणे प्रतिनिधी :



वर्तकनगर येथील सरगम सोसायटी बिल्डिंग नंबर १२ इमारतीचा पुनर्विकास रखडल्याने येथील रहिवाशांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे. ठाण्यातील वरिष्ठ नेत्यांकडेही या संदर्भात गाऱ्हाणे घालूनही न्याय मिळत नसल्यामुळे मतदानावर बहिष्कार घालण्याचा टोकाचा निर्णय घ्यावा लागत असल्याचा दावा स्थानिक रहिवाशांकडून करण्यात आला आहे. रहिवाशांच्या या निर्णयामुळे मतदान वाढीसाठी प्रयत्न करणाऱ्या निवडणूक विभागाच्या प्रयत्नांना ब्रेक लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या नागरिकांच्या समजुतीसाठी कोणते प्रयत्न होतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ठाण्यातील वर्तकनगर येथे निविदा प्रक्रिया राबवूनही इमारतीच्या पुनर्विकासासाठी खाजगी विकासकाची निवड करण्यात आली. परंतु २०१४ मध्ये करारनामा होऊन सुध्दा या इमारतीचा पुनर्विकास गेल्या दहा वर्षांपासून थांबला आहे. एकीकडे देश विकासाच्या नवी शिखरे पादाक्रांत करत असताना येथील रहिवशांच्या आयुष्यातील सर्वात महत्वाचा काळ वाया जात असल्यामुळे येथील रहिवासी प्रचंड अस्वस्थ झाली आहेत.

# कॅनमधील थंड पाण्याच्या बेकायदा धंद्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

● सांगली प्रतिनिधी :



उन्हाचा पारा वाढेल, तशी कॅनमधील थंडगार पाण्याची मागणी प्रचंड वाढू लागली आहे. सांगली, मिरजेत दिवसाकाठी हजारो लिटर पाण्याची विक्री होते; पण या व्यवसायावर आरोग्याच्या दृष्टीने कोणाचेच नियंत्रण नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे हा व्यवसाय लोकांच्या आरोग्याशी खेळण्याचा धंदा ठरला आहे.

प्रत्येक लग्नसोहळयात, सार्वजनिक कार्यक्रमात कॅनमधील पाणी पुरविले जाते. मिनरल वॉटरच्या नावाखाली कॅनमधील थंड पाणी डोळे झाकून पिले जाते. सांगली, मिरजेत असे किमान २०० हून अधिक आरओ प्रकल्प सुरू आहेत. त्यांच्यावर महापालिका, अन्न व औषध प्रशासन किंवा अन्य कोणत्याही शासकीय विभागाचे नियंत्रण नाही. सीलबंद पाण्याच्या बाटलीचे उत्पादन आणि विक्रीवर अन्न व औषध प्रशासन विभागाचे नियंत्रण आहे; पण खुल्या पाण्याच्या विक्रीवर नियंत्रण कोणाचे? हा प्रश्न अनुत्तरीत आहे. महापालिकेचा आरोग्य विभाग, अन्न व औषध प्रशासन विभाग, भारतीय मानक ब्युरो, वैधमापनशास्त्र विभाग आणि अन्य सरकारी विभाग यापैकी कोणीच जबाबदारी घेत नाही. त्यामुळे असे आरओ प्रकल्प गल्लोगल्ली फोफावले आहेत.

### कॅनमधील पाण्याविषयी अनेक प्रश्न उपस्थित होतात? पाण्याच्या शुद्धतेची हमी काय?

मानकानुसार ते थंड केले जाते का? त्याचा पीएच तपासला जातो का? कॅन खाद्यवस्तूंच्या निकषातील प्लास्टिकचे असतात का? कूपनलिकेतील पाण्याच्या शुद्धतेची हमी काय? शुद्ध पाण्याच्या नावाखाली फक्त थंड केलेले पाणी मिळते, ही फसवणूक नाही का?

लोकांचे आरोग्य सांभाळण्याची जबाबदारी असलेल्या अनेक सरकारी कार्यालयांतच कॅनमधून पाणी मागविले जाते. स्वच्छ दिसते म्हणून नागरिकही डोळे झाकून पितात; पण त्यातून अनेकांना पोटाच्या विकारांचा सामना करावा लागत आहे.

नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा ही शासनाची जबाबदारी आहे. आरओ प्रकल्पातील पाण्याच्या शुद्धतेविषयी शासनाने निश्चित धोरण ठरवायला हवे. एखाद्या सक्षम विभागाकडे जबाबदारी द्यायला हवी, तरच ग्राहकांची फसवणूक टळेल.

- सुरेश हराळे, माहिती अधिकार कार्यकर्ता, मिरज

कॅनमधील पाण्याच्या विक्रीशी आमच्या विभागाचा संबंध येत नाही. त्याचे परवाने किंवा अन्य कोणतीही बाब आमच्या विभागांतर्गत नाही.

- निलेश मसारे, सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन

# 22 वर्षीय मुलीच्या लग्नाचा विचार मनातच राहिला, घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेत टॅक्सी चालक वडिलांवर काळाचा घाला

● मुंबई प्रतिनिधी :




दाटून आलेले कंठ, अश्रू वाहून कोरडे पडलेले डोळे अन् आपलं जिवाभावाचं माणूस गेल्याने आयुष्यात आणि अख्ख्या भवतालात आलेलं रितेपण. ही परिस्थिती आहे, घाटकोपर दुर्घटनेत आपली जीवाभावाची माणसं गमावलेल्या कुटुंबियांची.

मुंबईतील घाटकोपरमध्ये सोमवारी होर्डिंग कोसळून मोठी दुर्घटना घडली. या अपघातातील मृतांची संख्या 14 वर गेली असून 74 जणांना वाचवण्यात यश आलं आहे. घाटकोपरच्या पोलीस मैदानावरील पेट्रोल पंपावर 250 टन वजनाचे बेकायदेशीर जाहिरात होर्डिंग अचानक वादळानंतर कोसळलं. या दुर्घटनेमुळे अनेक जणांचे संसार उघड्यावर पडले आहेत.

वरळीच्या बशीर अहमद असिक अली शेख टॅक्सी चालवून कुटुंबाचं पोट भरत होते. 22 वर्षीय मुलीच्या लग्नाची तयारी सुरू होती. अशातच सीएनजी भरण्यासाठी ते घाटकोपरच्या पंतनगरच्या पेट्रोल पंपावर गेले आणि ते परत आलेच नाहीत. त्यांच्या अंगावर होर्डिंग पडलं आणि त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर.

पत्नी आणि चिमुकल्या मुलाचा आधार हरपला

ज्या पेट्रोलपंपावर होर्डिंग कोसळलं, त्याच पेट्रोल पंपावर काम करणाऱ्या सचिन यादव यांच्यावरही काळाने घाला घातला आहे. सचिन यादव यांची शिफ्ट बदलली आणि बरोबर चार वाजता ते कामावर हजर झाले आणि इतक्यात होर्डिंग कोसळून त्यांचा जीव गेला. आता त्यांची पत्नी आणि चार वर्षांच्या मुलाचा आधार हरपला आहे.

घाटकोपरच्याच कामरान नगरचे रहिवासी असलेले 48 वर्षीय मोहम्मद अक्रम रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवायचे.